सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ८८ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना आदिलने केली मदत

### २०१८ मध्ये वैध विद्यार्थी व्हिसावर गेला होता पाकिस्तान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६जम्मू काश्मीर**

पहलगाम हल्लयात २६ निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या हल्लयानंतर भारताने पाकिस्तानची नाकेबंदी करुन जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. दुसरीकडे, दहशतवाद्यांविरुद्धची कारवाई तीव्र करण्यात आली आहे. शोपियां, कुलगाम आणि पुलवामा येथे दहशतवाद्यांच्या घरांना लक्ष्य करण्यात आले आहे. दहशतवाद्यांची घरे बॉम्बने उडवून देण्यात आली आहेत. दहशतवादी आदिल थोकरचे घरही बॉम्बने उडवून देण्यात आले. पहलगाम हल्लयातील दहशतवाद्यांना आदिलने मदत केल्याचे समोर आले आहे.

आदिल थोकर ऊर्फ आदिल गुरी असे नाव असलेल्या दहशतवाद्यानेच बैसरनमध्ये पर्यटकांची हत्या करण्याचा कट रचला आणि तो हल्ला घडवून आणण्यासाठी पाकिस्तानातील दहशतवाद्यांना मदत केल्याचा आरोप आहे. आदिलनेच पाकिस्तानी दहशतवाद्याला भारतात प्रवेश करून दिला होता. त्यानंतर हल्ला करण्यात आला. बिजबेहारा येथील गुरी या छोट्याशा गावातील रहिवासी आदिल अहमद थोकर या कटात सहभागी असल्याचे उघड झालं. गुप्तचर संस्थांच्या मते, आदिलने पाकिस्तानातून एका



दहशतवाद्याला भारतात घुसवण्यात आणि पहलगाम हल्ल्याचा कट रचण्यात मदत केली.

आदिल २०१८ मध्ये वैध विद्यार्थी व्हिसावर पाकिस्तानला गेला होता. तो कट्टरपंथी विचारसरणीने प्रभावित होता. पाकिस्तानमध्ये, त्याने सीमेपलीकडे कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांच्या प्रमुखांशी संपर्क साधला होता. पाकिस्तानमध्ये असताना तो सुमारे आठ महिने सुरक्षा यंत्रणांच्या नजरेतून गायब राहिला. भारतीय गुप्तचर यंत्रणा त्याच्या डिजिटल हालचालींवर आणि बिजबेहरा येथील त्याच्या घरावर बारीक लक्ष ठेवून होत्या. २०२४ मध्ये त्याच्या हालचालींवर लक्ष वाढवण्यात आले.ऑक्टोबर २०२४ मध्ये, आदिलने पूंछ-राजौरी सेक्टरच्या खडकाळ आणि दुर्गम भागातून गुप्तपणे भारतात घुसखोरी केली. त्याने ३-४ लोकांच्या गटासह नियंत्रण रेषा ओलांडली. भारतात प्रवेश केल्यानंतर, आदिलच्या किश्तवाडमधील हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. तो किश्तवार किंवा त्रालच्या टेकड्यांमधून अनंतनागला पोहोचला, जिथे त्याने दहशतवाद्यांशी पुन्हा संपर्क निर्माण केला किंवा मोठा कट रचण्याची तयारी सुरु केली होती.


त्यानंतर आदिलने पहलगाम हल्ला करणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्याला अनेक आठवडे आश्रय दिला होता. योग्य संधी मिळेपर्यंत तो शांत राहिला. दुसरीकडे, अनंतनाग यात्रेमुळे बैसरन व्हॅली बंद करण्यात आली होती. मार्चपासून पर्यटक पुन्हा तिथे येऊ लागले. याचा फायदा घेत आदिलने बैसरनवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. प्राथमिक तपासात या हल्लयात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांची संख्या पाच ते सात असू शकते. पाकिस्तानात प्रशिक्षण घेतलेल्या किमान दोन स्थानिक अतिरेक्यांनी त्यांना मदत केली होती.

## पहलगाम हल्ल्याची आधी जबाबदारी घेतली, आता भारताने कारवाई सुरू केल्यावर टीआरएफचा 'यू-टर्न'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६जम्मू काश्मीर**

मंगळवारी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अचानक हल्ला केला. या हल्लयात २६ पर्यटकांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर देशभरातून पाकिस्तानविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्याच दिवशी या हल्लयाची जबाबदारी टीआरएफने घेतली. पण, भारताने त्या दिवसापासूनच कारवाईला सुरुवात केली. दहशतवाद्यांच्या घरांवर कारवाई केली, पाकिस्तानविरोधात कारवाई सुरू केली. ही कारवाई पाहून आता टीआरएफने यू-टर्न घेतला आहे.

टीआरएफ घाबरले आहेत. लष्कर-ए-तैयबाशी संलग्न असलेल्या दहशतवादी संघटनेने आणखी एक निवेदन जारी केले आहे. यामध्ये टीआरएफने बैसरन पहलगाम दहशतवादी हल्लयात आपला सहभाग नाकारले आहे. टीआरएफने आपल्या आधीच्या विधानापासीन यू-टर्न घेत म्हटले




आहे की, हल्लयानंतर लगेचच कोणीतरी त्यांचे सोशल मीडिया हँडल हॅक केले आणि पहलगाममध्ये भारतीय पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाल्याचा दावा करणारी पोस्ट शेअर केली. दरम्यान, आता टीआरएफने एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. 'पहलगाम घटनेशी त्यांचा काहीही संबंध नाही, असा यात दावा केला आहे.

## हिंदुंनी कुठल्याही दुकानदाराकडून वस्तू विकत घेण्याआधी त्याचा धर्म विचारला पाहिजे - नितेश राणे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मुंबई**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्लयामुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. या दरम्यान महाराष्ट्र सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी केलेल्या वक्तव्याची चर्चा होत आहे. हिंदुंनी कुठल्याही दुकानदाराकडून कुठलीही वस्तू विकत घेण्याआधी त्याचा धर्म विचारला पाहिजे असं नितेश राणे यांनी म्हटलं आहे.

त्याचबरोबर दुकानदाराला हनूमान चालीसा येत नसेल, तर त्याच्याकडून सामान विकत घेऊ नका पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर नितेश राणे यांनी हे वक्तव्य केलं आहे. नितेश राणे यांच्या या वक्तव्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात दापोली शहरात एका जनसभेला संबोधित करताना नितेश राणे यांनी हे वक्तव्य केलं आहे. त्यांनी मारण्याआधी आपला धर्म विचारला. म्हणून हिंदुंनी सुद्धा काही विकत घेण्याआधी त्यांचा धर्म विचारला पाहिजे असंही ते म्हणाले आहेत.

**हनूमान चालीसा म्हणायला लावा**

असही होईल की, काही दुकानदार त्यांचा धर्म सांगणार नाहीत, त्यांच्या श्रद्धेबद्दल खोटं सांगतिल असं नितेश राणे म्हणाले. जेव्हा तुम्ही खरेदीसाठी जाल, तेव्हा त्यांना त्यांचा धर्म विचारा. त्यांनी सांगितलं की, ते हिंदू आहेत, तर त्यांना हनूमान चालीसा म्हणायला लावा. त्यांना हनूमान चालीसा येत नसेल, तर त्यांच्याकडून काही विकत घेऊ नका असं नितेश राणे म्हणाले.

## मनसेकडून प्रतिसभागृह, आदित्य ठाकरेंना निमंत्रण; भाजपा नाराज, सहभागी होण्यास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून मनसे आणि ठाकरे गट एकत्र येण्याच्या चर्चांनी चांगलाच जोर धरला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या आवाहनाला ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेली साद चर्चेचा विषय ठरली. यानंतर दोन भाऊ एकत्र येण्याबाबत राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लावले जाऊ लागले. यातच मुंबई महापालिकेच्या धर्तीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आयोजित केलेल्या प्रतिसभागृहाचे आमंत्रण भाजपाने नाकारल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, मनसेने ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांना या प्रतिसभागृहासाठी आमंत्रित केल्याने भाजपा नेते नाराज झाले असून, यामुळे प्रतिसभागृहात सहभागी होण्यास नकार दिल्याचा दावा राजकीय वर्तुळात केला जात आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या राजकीय टाळीची चर्चा सुरू असतानाच, भाजपाने मनसेचे निमंत्रण नाकारल्याने



नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

मागील काही वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने पालिकेचे सभागृहाच भरलेले नाही. त्यामुळे लोकांच्या अनेक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष नसल्याने मनसेने महापालिकेच्या धर्तीवर प्रतिसभागृह आयोजित करण्याची घोषणा केली होती. या प्रतिसभेसाठी मनसे नेते संदीप देशपांडे यांच्याकडून राज्यातील जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांना निमंत्रण देण्यात आले होते. यात आदित्य ठाकरे, भाजपाचे आशिष शेलार, समाजवादी पक्षाचे रईस शेख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या राखी जाधव, मुंबई काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे सिद्धार्थ कांबळे आणि शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतु, मनसेचे हे आमंत्रण भाजपाने नाकारले आहे. राज्यात एकीकडे ठाकरे गट आणि मनसेच्या मनोमिलनाच्या चर्चेला उधाण आलेले असतानाच, भाजपाने मनसेचे आमंत्रण नाकारल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

**भाजपाने आपल्या पत्रात काय म्हटले आहे?**

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता महापालिका प्रतिसभागृहात २५ वर्षे पराकोटींचा भ्रष्टाचार करणाऱ्यांच्यासोबत चर्चेत सहभागी होण्यापेक्षा भाजपा रस्त्यावर उतरून मुंबईकरांच्या समस्या सोडविण्यासाठी यापूर्वी प्रमाणेच सातत्याने अग्रेसर व कटिबद्ध राहील. पुनश्च एकदा आपल्या निमंत्रणाबद्दल आभार!

## मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल होणार जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ पुणे**

राज्यात सध्या दहावी- बारावीच्या परीक्षा संपून आता मोठा झालाय. दरम्यान दहावी, बारावी परीक्षानंतर विद्यार्थी, पालकांकडून पुढील शिक्षणाची चर्चा आहे. मात्र, निकाल कधी लागणार? याचे पालकांना वेध लागले आहेत.

बारावीच्या विद्यार्थ्यांची ११ फेब्रुवारीपासून तर दहावीच्या विद्यार्थ्यांची २१ फेब्रुवारीपासून परीक्षा सुरू झाली होती. दरम्यान दहावी, बारावी निकालासाठी विद्यार्थी, पालकांना जास्त



दिवस वाट पाहावी लागणार नाही. कारण दहावी, बारावी परीक्षांचे निकाल मे मध्येच जाहीर केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांकडून तपासलेल्या उत्तरपत्रिकांचा आढावा अधिकारी दररोज घेत आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळतर्फे घेण्यात आलेल्या दहावी बारावीच्या २१ लाख विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर होणार आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसर्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. याबाबत लवकरच तारीख जाहीर केल्या जातील असेही बोर्डाकडून सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ही माहिती दिली.

## दहशतवादी हल्ल्यावेळी विमान कंपन्यांचा नालायक पणा

### १२ हजारवरचे तिकीट नेले ६५ हजारापर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

एकीकडे पहलगाममधील दहशतवादी हल्लयात २६ पर्यटकांनी जीव गमावला, देश दुःखात बुडाला... त्याचवेळी दुसरीकडे देशातील विमान कंपन्यांनी या हल्लयामध्ये संधी शोधण्याचा प्रयत्न केल्याचं दिसून आलं. श्रीनगर ते नवी दिल्ली या मार्गावरील नेहमीचे विमान तिकीट हे १२ ते १५ हजार इतके असते. मात्र हल्लयानंतर पर्यटकांची आगतिकता पाहता विमान कंपन्यांनी तिकीट दर ६५ हजारांपर्यंत नेले. यावरुन देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे.

आधीच संकटात सापडलेल्या पर्यटकांसमोर विमान कंपन्यांनी त्यांची लायकी दाखवत आणखी एक संकट उभं केलं. श्रीनगरहून दिल्लीला जाणाऱ्या विमानाच्या तिकिटात चौपट ते पाचपट वाढ करत फायदा कमावण्याचा प्रयत्न केला. पहलगाममध्ये २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्लयानंतर श्रीनगर ते दिल्ली आणि इतर शहरांच्या विमान तिकिटांच्या किमतीत अचानक वाढ झाली होती. २६ पर्यटकांचा बळी घेणाऱ्या हल्लयानंतर, संकटातून बाहेर पडण्यासाठी गर्दी झाली होती. त्याचा फायदा घेऊन विमान कंपन्यांनी तिकीट दरात अनेक पट वाढ केली होती.

## पुणे कोर्टाचा राहुल गांधींना समन्स

### स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मानहानीच्या खटल्यात ९ मे रोजी हजर राहण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६पुणे**

पुणे न्यायालयाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मानहानीच्या खटल्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांना समन्स बजावले आहे. लंडन दौऱ्यावर असताना राहुल गांधींनी सावरकरांबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कोर्टाने ९ मे रोजी राहुल गांधींना हजर राहण्याचे आदेश देखील दिले आहेत.

दरम्यान राहुल गांधींनी लंडन



येथील एका कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. या तक्रारीच्या आधारे राहुल गांधी यांच्या विरोधात पुणे येथील न्यायालयात बदनामीचा फौजदारी खटला दाखल करण्यात आला होता. या खटल्यासंदर्भात पुणे न्यायालयाने ९ मे रोजी काँग्रेस नेते राहुल गांधींना कोर्टासमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान वि.दा. सावरकर हे इंग्रजांचे सहकारी होते आणि त्यांना इंग्रजांकडून निवृत्तिवेतन मिळत होते या विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत ताशेरे ओढले. सावरकरांवर राहुल गांधी 'बरळल्यास' आता सुप्रीम कोर्ट स्वत: कारवाई करेल. इतिहास जाणून न घेता वक्तव्य करू नका. तुम्ही राजकीय पक्षाचे नेते आहेत. महाराष्ट्रत सावरकरांची पूजा केली जाते. त्यामुळे सावरकरांवर बोलू नये, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे.

## पहलगाम घटनेबाबत जशास तसं उत्तर देण्यासाठी पंतप्रधानांना शक्ती मिळावी; भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डांची बाप्पा चरणी प्रार्थना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ पुणे**

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला केला असून, दहशतवाद्यांकडून झालेल्या गोळीबारात २६ जणांचा मृत्यू झालाय, यामध्ये महाराष्ट्रातील पाच पर्यटकांचा समावेश आहे. यातील दोन पर्यटक हे पुण्याचे असून, कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे यांचा यात मृत्यू



झालाय. या घटनेबाबत देशभरातून रोष व्यक्त केला जातोय. असं असताना याबाबत केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केलीय.

ते म्हणाले की, ज्या पद्धतीने दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये कृत्य केलंय, त्यामुळे देश दुःखात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून याचं उत्तर देण्याची आशा व्यक्त केलीय. तसेच देश या संकटातून मजबुतीने पुढे जायला हवा आणि जे दोषी आहेत, त्यांना जशास तसं उत्तर देण्यात यावं, यासाठी बाप्पाचा आशीर्वाद मिळावा तसेच बाप्पाच्या आशीर्वादाने देश या संकटातून बाहेर यावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात याचं उत्तर देण्यात येईल आणि यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना शक्ती देण्यात यावी ही प्रार्थना दगडूशेठ बाप्पा चरणी करण्यात आल्याचं यावेळी जे. पी. नड्डा म्हणाले.

## संपादकीय ......

# मानसिकता समजून घ्यावी लागेल!

काश्मीरमधील पहलगाम येथील क्रूर आणि भ्याड हत्याकांडाने सगळा देश हादरून गेला आहे. ज्यांच्या कुटुंबातले लोक या हल्ल्यात मारले गेले त्यांच्या कुटुंबीयांचा आक्रोश कानात सर्वांच्या घुमतो आहे. क्रूरकर्म्यांचे ते क्रूर कृत्य लोकांच्या डोळ्यांसमोरून अजूनही जात नाही अशी स्थिती आहे.

गेला संपूर्ण आठवडा मूर्शताबाद आणि बंगालमधील मुस्लीम बहुल ठिकाणी तसेच अन्य सर्वत्र वक्फ बोर्डाच्या नवीन कायद्यासंदर्भात झालेली निदर्शने आणि त्या निमित्ताने झालेली आंदोलने, हिंदूंवर झालेले अत्याचार याने हिंदू जनमानस ढवळून निघाला होता. आणि आता ही घटना घडली आहे. समाज क्षुब्ध होत आहे. सरकारकडे कडक कारवाईच्या मागण्या होत आहेत. मोर्चे निघत आहेत. पाकिस्तान विरुद्धच्या घोषणा होत आहेत. नेहमीप्रमाणे राजकारणी गिधाडे या सगळ्या प्रसंगात ही आपली गिधाडी वृत्ती न सोडता सरकारवर आरोप करीत आहेत. रॉबर्ट वडेरा हिंदुत्वाला दोष देत आहे. उबाठा गटाचे प्रवक्ते आणि तमाम उबाठा गँग भाजपाने धर्मावर आधारित भांडणे लावल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप करून आपला नालायकपणा सिद्ध करत आहे. फारुख अब्दुल्ला पाकिस्तानी लोकांनी बांगड्या भरलेल्या नाहीत अशी दर्पोक्ती करण्याची हिंमत करतो आहे आणि भारतातील या सगळ्या घडामोडींकडे बघून पाकिस्तानी राक्षस मनोमन हसतो आहे.

मोहम्मद बिन कासीम, गझनी मोहम्मद, मोहम्मद घोरी, तुघलक, खिलजी, बाबर, औरंगजेब, अफझल खान या आक्रमकांच्या अत्याचारांच्या कहाण्या पुन्हा जागृत होणारे हत्याकांड काल घडले. दहशतवादीवृत्तीला धर्म नसतो हे लिब्रांडू, डावे, तथाकथित सेक्युलरिस्ट यांच्या आवडत्या वाक्याला छाती ठोकून या दहशतवाद्यांनी धर्म विचारत, कलमा वाचायला लावून, सुंता झाली नाही याची खात्री करत निष्पाप लोकांना गोळ्या घातल्या आणि सिद्ध केले आमच्या दहशतवादाचा धर्म कोणता आहे ते. हिंदू समाज ही मानसिकता न समजल्यामुळे पारतंत्र्यात गेला. काही काळ गुलाम बनला. खंडित झाला. स्वतंत्र झाल्यावर आजही ७५ वर्षांनी आतंकी छायेतून स्वतःला बाहेर काढू शकलेला नाही. राजकारण्यांनी ही मानसिकता जाणूनबुजून मतांच्यासाठी दुर्लक्षित केली. प्रशासकीय व्यवस्थेतील इंग्रज छाप बाबूंनी या मानसिकतेला जिवंत ठेवले. मुल्ला, मौलवी यांनी स्वतंत्र भारतात ही मानसिकता आणखी प्रज्वलित केली. परिणाम काश्मीर ते सर्वत्र भारतमाता रक्तबंबाळ होत चालली आहे. ही मानसिकता समजून घेण्यासाठी काफीर, गझवा ए हिंद, दार उल अरब, दार उल इस्लाम, जिहाद या संकल्पना ज्या मदरशांमधून शिकवल्या जातात आणि त्यातून रॅडिकल इस्लामी आतंकवादी जन्म घेतात या संकल्पना हिंदू समाजाला समजणे गरजेचे आहे. राजकारण्यांनी कुठल्याही पक्षाचे असेना आपल्या भावी पिढ्यांच्यासाठी का होईना याचा जमिनीवरील परिणाम मतांच्या लालसेतून बाहेर येत समजून घेतला पाहिजे . भाषिक अस्मिता, प्रांतिक अहंकार, जातीय दुराभिमान ज्यामुळे हा हिंदू समाज एकसंध होत नाही त्या वृथा गोष्टींचे अंकुर, काटे छाटून टाकले पाहिजेत कारण यापेक्षा वर उल्लेख केलेल्या संकल्पना उद्या तुमच्या घराचे दरवाजे तोडून कधी आत घुसतील ते कळणार पण नाही. पश्चाताप त्यावेळी करण्यापेक्षा हिंदूंनो वेळीच सावरा आणि संघटित व्हा.या रॅडिकल, एकेश्वरवादी विचारांनी संपूर्ण जगाची शांतता बिघडवली आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली, ब्रिटन, सगळे देश आज होरपळून निघत आहेत. स्वस्त मजूर मिळतात या मोहातून आणि उदार मानसिकता यातून केलेल्या चुकांमुळे त्यांना आज पश्चात्ताप होत आहे. सर्वत्र लोकसंख्येचे असंतुलन घुसखोरी आणि अमर्यादित प्रजनन या दोन मार्गांतून साधले जात आहे. संपूर्ण जग ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या मनुष्य या सर्वोच्च सुंदर निर्मितीला नष्ट करत आणि त्यातून निर्माण झालेल्या उज्ज्वल मानवी मूल्यांना पायदळी तुडवत खैबर खिंडीतून आलेल्या या वावटळीला कोणे एके काळी पृथ्वीराज चौहान, राणा सांग, राजा दाहीर, राणा प्रताप, गुरू गोविंद सिंग, राजा रणजीत सिंग, लाचित बड फुकान आणि अर्थात आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रोखून धरल्यामुळे जगातील मानवता अजूनही टिकून आहे.छत्रपती शिवरायांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून प्रतापराव गुजर यांना त्यांनी दूषणे दिली. त्यांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून अफजलखान याचा वध झाला, शाहिस्तेखानाची बोटे गेली. हिंदू साम्राज्याची पुन्हा निर्मिती झाली. आमच्या आजूबाजूला असणाऱ्या आणि काळाच्या ओघात मुस्लीम झालेल्या मंडळींनी मुल्ला मौलवी यांचा पगडा झुगारून दिला नाही. हिंदूंच्या भावभावना समजून घेतल्या नाहीत, तर येणाऱ्या काळात संघर्ष अटळ आहे. ही लढाई एकेश्वर वाद आणि एकम् सत् विप्राः बहुदा वदंती यातील आहे. जर हिंदू समाजाने ही मानसिकता समजून घेतली, तर या लढाईत हिंदू टिकाव धरू शकेल अन्यथा काय होईल हे सांगता येत नाही. कुठल्याही सरकारवर, पक्षावर, संघटनेवर आपले भविष्य सोपवून तात्कालिक मोर्चे काढून, स्मशान वैराग्य आणून हा प्रश्न सुटणार नाही. पाकिस्तान हा एक देश किंवा भूभाग नाही ती वृत्ती आहे. अखंड भारतात ती वृत्ती सर सय्यद अहमदखान याने जिवंत केली. मोहम्मद जीनाने त्यात अजून हवा भरली. परिणाम हिंदूंचा संहार. खिलाफत चळवळ परिणाम हिंदूंचा संहार. बांगला देशात सत्तांतर परिणाम हिंदूंचा संहार.मंदिरे लक्ष्य करणे, स्त्रियांना बाटवणे आणि हिंदूंना अपमानित करण्याची एकही संधी न सोडणे यातून जे घडत आले त्यातील एक घटना पहलगाममधली आहे. पुढील रमझान येईल तेव्हा काश्मीर आपल्या ताब्यात असेल, असे उद्गार काढणारा अतिरेकी संघटनेचा सरदार आणि पाकिस्तान नेमके का निर्माण झाले हे छातीठोकपणे सांगणारा पाकिस्तानचा आर्मी चीफ सगळ्यांचे लक्ष एकच आहे. हिंदू म्हणणारे सर्व संपवणे. मग त्यात बौद्ध, जैन, शीख, आस्तिक, नास्तिक सर्व आले. कुणीही सुटणार नाही. हे लिहिण्यामागे प्रस्तुत लेखकाचे समाजाला भयभीत करण्याचा उद्देश बिलकुल नाही. भारतातील मुस्लिमांनी इंडोनेशियाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून कट्टरता वाद नाकारला पाहिजे. यातच त्यांचे भले आहेच पण जागतिक शांततेसाठी ते आवश्यक आहे. हिंदू तत्त्व हे मूर्ती पूजा मानणारच.हिंदू देव देवतांच्या हातात शस्त्र आहेत ते शांती प्रस्थापित करण्यासाठी. उच्च मानवी मूल्ये जिवंत ठेवण्यासाठी. पहलगाम घटना हा दोन्ही बाजूने धोक्याची घंटा आहे. ममता, मुलायम, लालू, राहुल, प्रियांका आणि अलीकडे या कंपूत सामील ठाकरे पिलावळ काळाच्या ओघात अस्तित्वहीन होणार आहेत, पण तोपर्यंत जे नुकसान सहन करावे लागणार आहे ते कालच्या घटनेने अधोरेखित झाले आहे. पहलगाम घटनेतून हिंदू समाज जागृत होऊन त्याला शत्रूबोध कळाला आणि आपली राजकीय शक्ती वाढवण्यासाठी तो अधिक संघटित झाला तरच ज्यांनी आज हे समर्पण केले ते कारणी लागेल, अन्यथा अतिरेकी कारवाईतील आणखी एक घटना म्हणून ही घटना इतिहास जमा होईल. एव्हढाच कालच्या सुन्न, दाहक घटनेचा अन्वयार्थ म्हणावा लागेल.

## ठिबक व तुषार सिंचन तसेच वैयक्तिक शेततळे योजनेसाठी

# ५०० कोटी खर्चास शासनाची मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती–** प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत राज्यातील अल्प व अत्यल्प भू–धारक शेतकऱ्यांना ५५% आणि इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ४५% अनुदान देण्यात येते.



सदर अनुज्ञेय अनुदानाशिवाय मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भू–धारक शेतकऱ्यांना २५% आणि इतर शेतकऱ्यांना ३०% पूरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८०% व ७५% एकूण अनुदान देण्यात येते. त्याचप्रमाणे दिनांक २९ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेस सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरिता ₹५००.०० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.सन २०२५–२६ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना राबविण्यासाठी ₹५००.०० कोटी (रुपये पाचशे कोटी फक्त) निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता दिली आहे.–ींप गीहळ, २५/०४/२०२५ ५:१४ झच

**जूर कार्यक्रमाचा घटकनिहाय तपशील पुढीलप्रमाणे**

अ. क्र बाब मंजूर कार्यक्रम

१ सुक्ष्म सिंचन

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) घटकांतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान

अ) ठिबक सिंचन

आ) तुषार सिंचन ४००.०० कोटी

२ वैयक्तिक शेततळे १००.०० कोटी

एकूण ५००.०० कोटी

या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही महा–डीबीटी प्रणालीद्वारे करावी आणि लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदानाची रक्कम सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करण्यात येणार आहे.




## कुरकुरीत पापड खाण्याचा अन् वजन वाढण्याचा काही संबंध आहे का? पापड खाण्यापूर्वी वाचा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

जास्तीत जास्त लोकांना जेवणासोबत वेगवेगळे स्नॅक्स, चटण्या किंवा इतर पदार्थ खाण्याची सवय असते. लोणचे आणि पापड तर लोकांच्या जेवणातील महत्वाचा भाग असतात. सामान्यपणे तळलेला किंवा भाजलेला पापड जास्त लोक खातात. यांची टेस्ट जरी चांगली वाटत असली तरी यानं काय नुकसान होतं याची कुणालाही कल्पना नसते. तळलेले किंवा भाजलेले कुरकुरीत पापड खाल्ल्यानं काय नुकसान होतं हेच आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.




पापड तयार करणाऱ्या अनेक फॅक्टरीजमध्ये स्वच्छतेची किती काळजी घेतली जाते हे आपल्याला माहीत नसतं. हे पापड वाळवण्यासाठी उन्हात मोकळ्या जागेत ठेवले जातात. त्यावर धूळ–माती जमा होते.

बरेच लोक घरी तळलेले पापड खातात. पण तळलेल्या पापडांमध्ये तेल आणि फॅट दोन्ही अधिक प्रमाणात असतात. काही रिसर्चनुसार, तळलेल्या आणि मंद आसेवर भाजलेल्या पापडामध्ये एक्रिलामाइड हे टॉक्सिन अधिक प्रमाणात असतं. याने अस्वस्थपणा, घाबरणे आणि मूड स्विंग अशा समस्या होत असतात.

दुकानातून खरेदी केलेल्या पापडांमध्ये नेहमी आर्टिफिशिअल फ्लेवर आणि मसाले टाकलेले आढळतात. या फ्लेवर आणि मसाल्यांमुळे पोटाची समस्या होऊ शकते. जास्त पापड खाल्ल्याने अपचनाची समस्या होऊ शकते.

दोन पापड हे एका चपातीच्या बरोबरीत असतात. तसेच यात कॅलरीही भरपूर असतात. त्यामुळे तुम्हाला कॅलरी कमी करायच्या असतील तर पापड खाऊ नका.

तसेच फार जास्त काळासाठी पापड ताजे रहावे म्हणून पापड तयार करणाऱ्या कंपनी यात प्रिजरवेटीव्ह टाकतात. सोबतच यात मिठासोबत सोडियम सॉल्टही टाकतात. याने पापडाची चव वाढते. जास्त मीठ हे हार्ट आणि किडनीसाठी चांगलं नसतं.

# बदलत्या हवामानात पिकांसाठी काय आहे कृषी सल्ला

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ आणि मराठवाड्यात मागील दोन ते तीन दिवसांपासून उष्णतेत वाढ झाली होती त्यामुळे उन्हाच्या झळ्या जाणवत होत्या. आता उष्ण व दमट वातावरणामुळे पुन्हा एकदा अवकाळीचे संकट येण्याची शक्यता आहे त्यामुळे हळद, भुईमुग आणि फळबागांचे नियोजन कसे करावे याविषयीचा कृषी सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने दिला आहे.प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार २६ एप्रिल रोजी मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.२४ एप्रिल रोजी परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, धाराशिव, जालना व लातूर जिल्ह्यात तर २५ एप्रिल रोजी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण व दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यात पुढील ४ दिवसात कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होऊन त्यानंतर हळूहळू १ ते २ अंश सेल्सिअसने घट होण्याची तर पुढील दोन दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही व त्यानंतर १ ते २ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे.

**हवामान सारांश / चेतावनी :**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार २६ एप्रिल रोजी मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. २४ एप्रिल रोजी परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, धाराशिव, जालना व लातूर जिल्ह्यात तर २५ एप्रिल रोजी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण व दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे.

**सामान्य सल्ला :**विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाड्यात २५ एप्रिल ते १ मेदरम्यान पाऊस सरासरीपेक्षा कमी, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा जास्त व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे.

सॅक, इसरो अहमदाबाद यांच्या उपग्रहाच्या बाष्पोत्सर्जनाच्या जिल्हानिहाय व तालुकानिहाय छायाचित्रानुसार मराठवाड्यात बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला आहे.

**संदेश :** वाढत्या तापमानामुळे व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामुळे पिकात, फळबागेत, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनुसार सकाळी किंवा संध्याकाळी पाणी व्यवस्थापन करावे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे.

**पीक व्यवस्थापन**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी.

उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. भुईमूग पिकात आऱ्या सुटल्यानंतर अंतर मशागत करू नये.

उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षित करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.




उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंचा झाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फळबागेचे व्यवस्थापन**

घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनुसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे.नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी.

काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी करून घ्यावी. आंबा बागेत पाण्याचा ताण बसल्यामुळे फळगळ होऊ शकते, फळगळ होऊ नये म्हणून आंबा बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.

जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी.

काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेतील माती मोकळी करून खत व्यवस्थापन करावे. द्राक्ष बागेमध्ये एप्रिल छाटणी ही घड निर्मितीसाठी केली जाते. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणी १५ एप्रिल ते १५ मे या दरम्यान करावी.

**भाजीपाला** काढणीस तयार असलेल्या भाजीपाला, टरबूज, खरबूज पिकांची काढणी करून घ्यावी. भाजीपाला पिकात खुरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे.

# फक्त बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम आदिं अतिरिक्त सूचनांचे आवाहन

**बालकांच्या संरक्षणासाठी टोल फ्री नंबर १०९८ संपर्क साधावा**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती–** बालकांना समानपणे डांबून दाखवून समोरून शारिरिक, मानसिक व लैंगिक शोषण होत असल्याने त्यांचे बंधू बालय कायदा २०१५, २०१८ आणि सुधारित कायदा २०२१ नुसार कठोर विधान केले जाईल. त्यानुषंगाने आसपासच्या कोणत्याही समस्यात्य नागरिक असे दिसून येत आहे १०९ आपणास चाईल्ड ऑफिस देखील तसेच महिला व विकासास तत्काळ कळवावे, असे आवाहन हे महिला व बालविकास उपआ वि. के. मरसाले यांनी कळविले आहे.

पुणे पात्र आळंदी वस व तटस्थ खडवली येथे बेकायवीरगृहे, तिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याच्या बातम्या प्रकाशित आहेत. वृत्तपत्रे प्रकाशित बातम्यांनुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांसाठी स्वतंत्रपणे उभे राहून त्यांचे शारिरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणाची घटना घडत असल्याने वार्तालाप प्रसिद्ध दोन राष्ट्र निदर्शनास येत आहे. सदर बाब हि अत्यंत गंभीर न्यायाची आणि न्याय (ची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ आणि सुधारित कायदा २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल (मुलीची




काळजी व संरक्षण) नियम २०१८ मध्ये तरतुदींचे उल्लंघन मात्र आहेत.बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ आणि सुधारित कायदा २०२१ मधील कलम ४२ नुसार वैधानिक राज्याच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे प्रमाणपत्र प्राप्त नसलेली किंवा अशी संस्था चालविलेल्या व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच १.०० लक्ष रुपये कमी एवढा दंड किंवा अशी दोन्ही लोकशाही दोन्ही आहे.

आपणास निवेदन देताना अनुषंगिक कॉल वॉर्ड की, आपल्या आसपासच्या अधिकाराबाबत स्पष्टपणे जाहिर संस्था देखरेख तसेच जिल्हा अधिकारी व बालविकास अधिकारी हेल्पलाईन टोल फ्री १०९८ या वर साधकांकडून शारिरिक तसेच लैंगिक अपराध करण्यासाठी, असे महिला व बालविकास विभागाव्दारे कळविण्यात आले आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# अमरावतीतील ११८ पाकिस्तानी हिंदू नागरिकांना मोठा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

काश्मिरच्या पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर मंगळवारी केलेल्या हल्लयानंतर केंद्र सरकारने दहशतवाद्यांविरुद्ध कठोर कारवाईसाठी पावले उचलण्यास सुरूवात केली. त्यानुसार सर्व पाकिस्तानी नागरिकांचा व्हीजा तत्काळ प्रभावाने रद्द करून त्यांना ४८ तासांत देश सोडण्याचे सांगण्यात आले. त्या निर्णयात केंद्र सरकारने किंचित सुधारणा केलेली असून या निर्णयाचा अमरावतीतील ११८ पाकिस्तानी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाने अमरावतीतील पाकिस्तानी नागरिकांचे येथील वास्तव्य सुरक्षित झालेले आहे. अमरावती शहरात सद्यःस्थितीत



एकूण ११८ पाकिस्तानी नागरिक आहेत. ते सर्वच लाँगटर्म विजावर पाकिस्तानातून भारतात आलेले असून अमरावतीत १० ते १५ वर्षांपासून वास्तव्यासआहेत. कित्येकांनी आपापले व्यवसाय सुरू केलेले आहेत. भारतीय नागरिकत्व मिळावे, यासाठी त्यांनी केंद्र सरकारकडे अर्ज केलेले आहेत. त्यांच्या कागदपत्रांची सरकार पातळीवर पडताळणी सुरू असून पडताळणी अंती त्यांना भारतीय नागरिकत्व दिले जात आहे. मागील महिन्यात पाकिस्तानी नागरिकांचा एक मोठा जत्था धार्मिक कार्यक्रमासाठी अमरावतीत आलेला होता. धार्मिक कार्यक्रम आटोपून तो जत्था परत गेलेला आहे, असे पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी सांगितले. केंद्र सरकारने २०१९ ते २०२४ या कार्यकाळात पाकिस्तानी हिंदूंना भारतीय नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भारतात राहू इच्छिणाऱ्या पाकिस्तानी विशेषतः हिंदू धर्मीय पाकिस्तानी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. त्यांनी भारतीय नागरिकत्वासाठी केंद्र सरकारकडे अर्जही केले आहेत. त्यांना भारत सरकारने दीर्घ कालावधीचा विजा दिलेला आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्लयानंतर केंद्र सरकारने आक्रमक भूमिका घेत सर्व पाकिस्तानी नागरिकांचा तत्काळ प्रभावाने विजा रद्द केला. त्यांना ४८ तासांत देश सोडण्यास सांगितले होते. त्या पाठोपाठ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशभरातील मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. सर्व पाकिस्तानी. नागरिकांना हुडकून काढून त्यांना देशाबाहेर काढण्याची कार्यवाही करण्याचे सक्त निर्देश दिले.



अमरावती शहरात ११८ पाकिस्तानी नागरिक आहेत. ते पाकिस्तानातील हिंदू निर्वासित असून त्यांना भारत सरकारने दीर्घ कालावधीचा (लॉगटर्म) विजा दिलेला आहे. हिंदू निर्वासित आणि लाँगटर्म विजा असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना कारवाईतून वगळण्याचे आदेश सरकारकडून प्राप्त झालेले आहे. त्यांच्याशिवाय अन्य कोणीही पाकिस्तानी नागरिक शहरात नाही, असे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना
# जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते जलरथाला हिरवी झेंडी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** मृद व जलसंधारण विभाग आणि भारतीय जैन संघाच्या वतीने जलरथाला आज जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी हिरवी झेंडी दाखविली.

यावेळी कमलताई गवई, अपर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, ज्ञानेश्वर घ्यार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, सोनाली कोकाटे, गोविंद कासट आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना शेतकऱ्यांना फायद्याची ठरणारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वत:हून पुढे येऊन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

जलरथ हा गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेची नागरिकांमध्ये जनजागृती करणार आहे. योजनेच्या माहितीसोबतच नागरिकांचे गाळ घेण्याबाबतचे अर्जही यामार्फत भरून घेतले जाणार आहे. तसेच जलरथावर क्यूआर कोड देण्यात आला असून नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. शेतकऱ्यांना धरणातील सुपिक गाळ शेतामध्ये टाकण्यासाठी मोफत उपलब्ध होणार आहे. केवळ इंधनाचा खर्च संबंधित शेतकऱ्याला करावा लागणार आहे.राज्यातील विविध जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना यशस्वी झाली असून जिल्ह्यातही ही योजना राबविण्यात येत आहे. जलरथाच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत ही योजना पोहोचविण्यात येणार आहे. जिल्ह्यात सध्यास्थितीत ११७ धरणातून गाळ काढण्यात येत आहे. यामुळे जलसाठा वाढण्यासोबतच शेतजमीन सुपिक होण्यास मदत होणार आहे. तसेच भुजल पातळी वाढून विहिरीमध्ये पाणी येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मेंढपाळांच्या मेंढी व शेळी च्या चारा समस्येविषयी वनविभागाने घेतली आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

मेंढपाळ विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष श्री. संतोष महात्मे यांचे विनंतीवरून मुख्य वनसंरक्षक, अमरावती विभाग यांचे कार्यालयात मेंढपाळांच्या समस्येबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. भटकंती करणाऱ्या मेंढपाळांच्या पशुंच्या चारा नियोजनाकरिता अमरावती वनवृत्ताच्या मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) श्रीमती बॅनर्जी मॅडम यांनी अमरावती विभागातील मेंढपाळांची बैठक आयोजित केली. वन विभागामार्फत श्रीमती जयोती बॅनर्जी, मुख्य वनसंरक्षक अमरावती वनवृत, धैर्यशील पाटील, उपवन संरक्षक अमरावती वनविभाग, श्रीमती गवस मॅडम उपवन संरक्षक बुलढाणा वनविभाग, श्री. करे साहेब विभागीय वन अधिकारी सामाजिक वनविभाग अमरावती, किरण पाटील, विभागीय वन अधिकारी (दक्षता),अमरावती वनवृत, ज्ञानेश्वर देसाई, सहाय्यक वनसंरक्षक, अमरावती यांचे सह सर्व वन वृत्ताचे डी. एफ. ओ, आर. एफ. ओ. व्हीसीद्वारे उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे उपसंचालक कावरेसाहेब, जिल्हा आरोग्य



## .मेंढपाळ धनगर विकास मंच व भेडपाल शेतकरी प्रोड्रूसर कंपनी चा पुढाकार

अधिकारी सोळंके उपस्थित होते. या बैठकीमध्ये चारा नियोजन व इतर विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मेंढपाळांच्या विविध समस्येवर शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून मेंढपाळांच्या जीवनामध्ये स्थिरता आणण्याकरिता उपाय योजना करण्यावर चर्चा करण्यात आली. वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली. मेंढपाळांच्या भटकंती जीवनक्रमाला थांबविण्याकरिता, त्यांच्या जीवनामध्ये स्थैर्यता आणण्याकरिता विविध उपाय योजना करण्यावर भर देण्यात आला व या करिता शासन स्तरावर प्रयत्न करण्याचे विषयी सांगण्यात आले. यावेळी मेंढपाळ विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष श्री संतोष महात्मे, मेंढपाळ विकास मंच चे अमरावती जिल्हाध्यक्ष जानरावजी कोकरे, हरिभाऊ शिंदे, झामा कारंडे, रतन यमगर, तुकाराम यमगर, शरद शिंदे, संजय सूळ, गुणवंत कोकरे, नंदू शिंदे, बुलढाणा येथून ज्येष्ठ नेते श्री. रामभाऊ शिंगाडे, बाळू कारंडे, गजानन टेळे, एकनाथ आयनर, यवतमाळ येथून शरद सोन्नार, डॉ. भीमराव कोकरे, अनिल घुले, नागोराव शिंदे, शेकलाल सोन्नार, अकोला येथून नारायण शिंदे, आबाराव शिंदे, गजानन टिळे, बाबाराव शिंदे, यासोबतच भेडपाल शेतकरी प्रोड्रूसर कंपनीचे सीईओ प्रविण भुजाडे, संचालक पल्लवी लांडे यांचे सह मोठ्या संख्येने मेंढपाळ बांधव उपस्थित होते. अमरावती विभागातील इतर जिल्ह्यातील मेंढपाळ बांधव दृकसाव्य पद्धतीने उपस्थित होते.

# कॉम्प्युटर सेंटरमधून १३ लॅपटॉप चोरणाऱ्या दोघांना अटक

## आरोपींमध्ये एका अल्पवयीनचा समावेश, २ लाख ४२ हजाराचे सर्व १३ लॅपटॉप जप्त

### फ्रेजरपुरा डीबी स्कॉडची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –**

फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यातील डीबीस्कॉडने विवेकानंद कॉलनीतील श्रीकांत कॉम्प्युटर सेंटर दुकानाचे शटर तोडून १३ लॅपटॉप चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना अटक केली. आरोपींपैकी एक अल्पवयीन आहे. पोलिसांनी दोन्ही चोरट्यांच्या ताब्यातून त्यांनी चोरी केलेले २ लाख ४२ हजाराचे सर्व १३ लॅपटॉप जप्त केले.शिवकुमार उर्फ शिवा अमोल धोटे (१९) रा. राधेनगर, मोर्शी, जि. अमरावती, एक १६ वर्षीय अल्पवयीन रा. नेरपरसोपंत, जि. यवतमाळ अशी अटकेतील आरोपींची नाव आहेत. माहितीनुसार, तक्रारकर्ते संजय जगनराव अढाऊ (६३) रा. आयटिआय कॉलनी यांच्या मालकीचे विवेकानंद कॉलनीत श्रीकांत कॉम्पूटर सेंटर नामक दूकान आहे. अज्ञात चोरट्यांनी २४ एप्रिलच्या मध्यरात्री कॉम्प्युटर सेंटरचे मागील शटर तोडून दुकानातील १३ लॅपटॉप लंपास केले. २४ एप्रिलला संजय अढाऊ यांनी याबाबत फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला. घटनेचे गांभीर्य



लक्षात घेता फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार पीआय निलेश करे, दुय्यम ठाणेदार पीआय निलेश गावंडे, पीएसआय राहुल महाजन, डीबीस्कॉडचे प्रमुख हेड कॉस्टेबल योगेश श्रीवास, हरीश चौधरी, रोशन वऱ्हाडे, जयेश परिवाले, दिनेश नेमाडे यांनी युध्दपातळीवर गोपनीय व तांत्रिक पध्दतीने तपास सुरू केला. पोलिसांनी तपासादरम्यान दुकानातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली असता त्यामध्ये एक इसम तोंडाला स्कार्प बांधून आत ठेवलेले एच.पी. डेल, एसार कंपनीचे १३ लॅपटॉप बॅग मध्ये भरतांना दिसला. त्यानुसार पोलिसांनी २४ तासाच्या आत दोन्ही चोरट्यांची ओळख पटवून त्यांना अटक केली. दोन्ही चोरटे अमरावतीत भाड्याच्या खोलीमध्ये राहतात. अटक होताच चोरट्यांनी १३ लॅपटॉप चोरीची कबूली दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपींनी भाड्याच्या खोलीत लपवून ठेवलेले २ लाख ४२ हजाराचे १३ लॅपटॉप जप्त केले.

# प्रा. डॉ. शिवाजी जोशी यांना मानद डॉक्टरेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –** इंग्रजी विषयाचे गाढे अभ्यासक व प्राध्यापक डॉ. शिवाजी जोशी यांना नुकतीच अमेरीकेतील अत्यंत ख्यातनाम अश्या वॉशींग्टन डिजीटल विद्यापीठाची मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. इंग्रजी वाङ्मय या विषयामधे डॉ. शिवाजी जोशी यांनी केलेल्या अतुलनीय कार्याचा गौरव म्हणून ही मानद डॉक्टरेट त्यांना प्रदान करण्यात आली. दिल्ली येथे एका समारंभात ही पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. डॉ. शिवाजी जोशी हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या तिवसा येथील या.द.व. कला वाणिज्य महाविद्यालयामधे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. या महाविद्यालयात अनेक वर्षे सेवा दिल्यानंतर त्यांनी १९९६ साली स्वेच्छा निवृत्ती स्विकारली व त्यानंतर त्यांनी इंग्रजी वाङ्मयाचे खाजगी प्रशिक्षण देणे सुरु केले. त्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी इंग्रजी वाङ्मय या विषयाचे उत्तम ज्ञान प्रदान केले. आज प्रा. डॉ. शिवाजी जोशी यांचे अनेक विद्यार्थी पीएच.डी. धारक असून वेगवेळया महाविद्यालयांमधे तसेच शाळांमधे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षक या पदांवर कार्य करीत आहेत. समर्पित इंग्रजी शिक्षकांची एक मोठी फळी प्रा. डॉ. शिवाजी जोशी यांनी तयार केली. इंग्रजी वाङ्मयासोबत डॉ. जोशी हे इतिहासाचे गाढे अभ्यासक आहेत. तसेच विविध विषयांवर



लेखन करणे, नियतकालिकांमधून सामाजिक व ऐतिहासिक विषायंवर लिखाण करणे ही डॉ. जोशी यांच्या व्यक्तिमत्वाची महत्वाची बाजू आहे. त्यांची काही पुस्तके देखील प्रकाशित झालेली आहेत. प्रा. डॉ. शिवाजी जोशी यांना मिळालेल्या या सन्मानाने त्यांच्या विद्यार्थी वर्गास तसेच त्यांच्या वाचक वर्गास अतिशय आनंद होत आहे. ज्या गुरुच्या पाठबळामुळे आयुष्यात यशाला गवसणी घालता आली त्या गुरुचा झालेला हा अतुलनीय सन्मान अतिशय सुखावणारा आहे अशी भावना त्याच्या विद्यार्थी वर्गात निर्माण झाली आहे. प्रा. डॉ. शिवाजी जोशी हे दै. हिंदुस्थानचे नियमित लेखक असून दै. हिंदुस्थान मधे अनेक विविध विषयावर ते लेखन करीत असतात हे विशेष!

## पोलीस प्रशासनाला विविध बंदोबस्त दरम्यान उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल
# पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते होमगार्ड सैनिक प्रदीप दांडेकर यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –** शहर पोलीस आयुक्त मा. नवीनचंद्र रेड्डी साहेब यांच्या हस्ते होमगार्ड सैनिक चि. प्रदिप दांडेकर यांचे पुष्पगुच्छ सह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शहरातील गणेशोत्सव, नवरात्रोत्सव एकविरा देवी ,अंबादेवी परिसर, हनुमानगडी येथील शिवमहापुराण येथील अती महत्त्वाच्या बंदोबस्त दरम्यान लाखो भाविकांना, तसेच १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त हजारो भीमसैनिकांना कौन्सिलिंग करून विविध सूचना व मार्गदर्शन करून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अति महत्वपूर्ण कर्तव्य बंदोबस्त उत्कृष्ट रित्या पार पाडल्याबद्दल होमगार्ड सैनिक चि. प्रदीप दांडेकर यांचे पोलिस आयुक्त श्री नवीनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते विशेष पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कामगिरीमुळे होमगार्ड सैनिक प्रदीप दांडेकर यांचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन वर्षाव होत आहे. जिल्हा होमगार्ड समादेशक पंकज कुमावत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व सैनिकांनी प्रशिक्षण घेतले आहे. ज्या मध्ये श्री. राजपूत सर , श्री .पिजरकर सर, श्री.पोहरे सर यांचे योगदान आहे. प्रशिक्षण मध्ये



बंदोबस्त दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांना कॉन्सिलिंग कसे करावे, जेणेकरून गर्दी दरम्यान कोणतेही अनुचित प्रकार घडणार नाहीत. तसेच मा. पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी साहेबांच्या हस्ते झालेला सत्कार हा मी माझ्या अमरावती जिल्ह्यातील सर्व सैनिकांना समर्पित करतो. पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही सर्व सैनिक बंदोबस्तावर नेहमीच तत्पर असतो. यापुढे देखील अशीच याहीपेक्षा चांगली कामगिरी भविष्यात देखील आम्हा सर्व सैनिकांकडून करण्यात येईल. या सत्काराची दखल घेणारे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व सर्व पोलीस निरीक्षक साहेबांचे सर्व अमरावती शहर होमगार्ड पथकातर्फे आभार.

## आरोग्य विभागामार्फत हृदयविकारांसाठी
# सीपीआर जनजागृती मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये हृदयविकाराच्या धोक्यांविषयी आणि प्रथमोपचार म्हणून सीपीआर (कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन) बाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. हृदयविकाराच्या घटनांमध्ये तातडीने आणि योग्यवेळी सीपीआर दिल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात. याच उद्देशाने आरोग्य विभागाने विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचा निर्णय घेतला आहे. या जनजागृती कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावरील प्रशिक्षकांचे प्रशिक्षण रूग्णालयीन प्रशिक्षण केंद्र, जिल्हा प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आले. यात वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. यात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप आसोले, वैद्यकीय अधिक्षक डॉ. वर्षा श्रीखंडे, डॉ. संगिता मुखरे, डॉ. तृप्ती जवादे, डॉ. राधा सावदेकर, डॉ. आशिष भोगे, डॉ. प्रणित घोडमाडे, डॉ. ज्योत्स्ना पोटपिटे, संदिप काळे, श्री. ढोले यांनी मार्गदर्शन केले.येत्या काळात सीपीआर प्रशिक्षणाची जनजागृती मोहिम जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, गाव, शाळा, महाविद्यालयात राबविण्यात येणार आहे.

# राज्यात २८ वनाधिकाऱ्यांना ‘आयएफएस’ची हुलकावणी

## नॉमिनेशन होण्यास विलंब : २०२१ पासून प्रतीक्षा; राज्य सेवेतील अधिकाऱ्यांवर अन्यायच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २६ अमरावती :** गत चार वर्षांपासून राज्य सेवेतील वनाधिकाऱ्यांना भारतीय वनसेवेत (आयएफएस) पदावर जाण्यास चातक पक्षाप्रमाणे वाट बघावी लागत असून, राज्य शासनाच्या वेळकाढू धोरणाचा फटका २८ वनाधिकाऱ्यांना बसलेला आहे. ‘आयएफएस’ अवॉर्डसाठी सोमवारी (दि. २१) डीपीसी झाली असली तरी पोस्टिंग गुलदस्त्यात आहे. वनविभागात उपवनसंरक्षक पदापासून थेट प्रधान मुख्य वनसंरक्षक पदापर्यंत भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांना नियुक्ती दिली जाते. राज्य सेवेतील विभागीय वनाधिकारी (डीएफओ) यांना सेवाज्येष्ठता निकषानुसार आयएफएस पदावर दरवर्षी बढती दिली जाते. इतर राज्यात केंद्र शासनाकडे आयएफएस नामांकनासाठी राज्य शासनाकडून नावांची शिफारस केल्या जातात. असे असले तरी महाराष्ट्रात २०२१ पासून राज्य शासन सेवेतील वनाधिकाऱ्यांना आयएफएस होण्यापासून वंचित ठेवण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे.



**साइड पोस्टिंग रिकाम्या**

सध्या वनविभागात प्रादेशिक विभागाचे ४५ पदे असून, यापैकी केवळ दोन जागा रिक्त आहेत. वन्यजीव विभागात तसेच साइड पोस्टिंग ३०च्यावर रिक्त आहेत. २८ वनाधिकाऱ्यांमध्ये अनेकांना प्रादेशिकची भुरळ पडलेली दिसून येते. वन्यजीव विभागात जाण्यास कोणीही इच्छुक नाही. त्यामुळे टिपेश्वर, बाह्य मेळघाट, बोर, नवेगाव येथे आयएफएसऐवजी राज्य सेवेतील अधिकारी सेवा बजावत आहेत. हिंगोली, चिपळूण, परभणी, बीड, धाराशिव, जालना येथे आयएफएस दर्जाचे अधिकारी असणे गरजेचे झाले आहे.

**२८ वनाधिकाऱ्यांना ‘आयएफएस’ची प्रतीक्षा**

केंद्र शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक राज्याला राज्यसेवेतील अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक, विभागीय वनाधिकाऱ्यांना दरवर्षी यूपीएसी प्रमोशन कोट्यानुसार राज्य सेवेतील अधिकाऱ्यांना संधी मिळत असते. मात्र वनविभागातील वनाधिकाऱ्यांना ‘आयएफएस’ होता आले नाही. दरवर्षी ७ वनाधिकाऱ्यांना ‘आयएफएस’ अवॉर्ड मिळणे अपेक्षित असताना गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्रातील २८ वनाधिकारी ‘आयएफएस’ होऊ शकले नाहीत. सन २०२४चा कोटा १० वनाधिकाऱ्यांचा आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात २८ वनाधिकाऱ्यांना ‘आयएफएस’ होण्याचे संकेत मिळाले आहेत.

# विठ्ठल मंदिरात मोबाईल बंदीसह नव्या सुरक्षा योजना

## काश्मीरमधील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६पंढरपूर–** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आता मोबाईल बाळगण्यावर बंदी घातली आहे. तसेच मंदिरातील कर्मचारी, सुरक्षारक्षक यांना ओळखपत्र देण्याच्या सूचना केल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. पहलगाम घटनेनंतर पोलीस प्रशासनाने मंदिरातील सुरक्षितता वाढवण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्रवेश करणाऱ्या प्रवेशद्वारावर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच मंदिरात मोबाईल व कॅमेरा यंत्रणा



असलेल्या वस्तूंसह प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. मंदिरातील सर्व कर्मचारी आणि सुरक्षारक्षक यांनी समितीने दिलेले ओळखपत्र परिधान करण्याचे सक्तीचे केले आहे, अन्यथा कारवाईचा इशारा समितीने दिला आहे. कर्मचारी यांना मंदिरात प्रवेश करणे व बाहेर पडण्यासाठी फक्त ‘व्हिआयपी गेट’चा वापर करण्यात येणार असल्याचे श्रोत्री यांनी सांगितले.

येथील श्री विठ्ठल मंदिरास अतिरेकी कारवाईचा धोका लक्षात घेता २५ वर्षांपासून २४ तास पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच बॉम्बशोधक व नाशक पथक, श्वान पथक यांच्या मार्फत मंदिराची सुरक्षितता केली जाते. या शिवाय मंदिर समितीच्या वतीने अत्याधुनिक मशीनद्वारे तपासणी केली जाते. तसेच खासगी सुरक्षा यंत्रणा देखील कार्यरत आहेत. दरम्यान, मंदिरात भाविकांसह कर्मचाऱ्यांना मोबाईल बंदी सक्तीची करावी, अशी मागणी होत आहे. मंदिरातील काही कर्मचारी मोबाईलचा वापर करत असल्याच्या तक्रारी भाविकांच्या आहेत. तसेच मंदिर समितीने कर्मचारी यांना गणवेश ठरवून दिला आहे. मात्र, अनेक कर्मचारी गणवेश, ओळखपत्र याचा वापर करत नाहीत. आता या पार्श्वभूमीवर समिती अशांविरोधात कडक भूमिका घेणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. असे असले तरी अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर समिती सतर्क झाली आहे.

# शिक्षक भरतीसाठी ‘टेट’ परीक्षा कार्यक्रम जाहीर, अशा आहेत अटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी व्यवस्थापनाच्या तसेच शासनाच्या इतर विभागाच्या शाळा पदभरतीसाठी अपेक्षित चाचणी कार्यक्रम घोषित केला आहे. या शाळांमध्ये पवित्र या सांगणकीय प्रणालीमार्फत शिक्षक भरतीसाठी ‘ शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ ‘ जाहीर केली. त्यासाठी ऑनलाईन प्रणाली अर्ज मागविण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी २६ एप्रिल ते १० मे अशी मुदत आहे. ऑनलाईन पद्धतीने नमूद परीक्षा शुल्क १० मे पर्यंत भरायचे आहे. परीक्षेच्या सात दिवस आधी ऑनलाईन प्रवेश पत्र उपलब्ध करून घेता येईल. ऑनलाईन परीक्षा २४ मे ते ५ जून दरम्यान भौतिक सुविधा म्हणजे परीक्षा केंद्र व विद्यार्थी संख्येनुसार होणार आहे.एक खबरदारी घेण्याची सूचना आहे. २०१८ व २०१९ साली झालेल्या परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाली आहे. संभाव्य प्रत्येक विद्यार्थ्याने या यादीत आपले नाव आहे अथवा नाही याची खात्री करावी. तेच अर्जात नमूद करावे. चुकीची माहिती दिल्यास कारवाई होणार.

या चाचणी परीक्षेचा आधार उपलब्ध पदसंख्या राहील. राज्यातील शिक्षण सेवक व शिक्षक यांच्या रिक्त पदांची माहिती, विषय, प्रवर्ग, माध्यम व बिंदूनामावली नुसार पवित्र या संगणकीय प्रणाली मार्फत प्रसिद्ध होणार. परीक्षा माध्यम मराठी, इंग्रजी व उर्दू असणार. भाषिक क्षमता ( मराठी व इंग्रजी ) यावरील प्रश्न वगळता इतर सर्व प्रश्न द्विभाषिक असतील. म्हणून उमेदवारांनीइंग्रजी – मराठी अथवा इंग्रजी – उर्दू यापैकी एक माध्यम अर्ज दाखल करतांना नमूद करणे आवश्यक आहे. प्रश्नांचे भाषांतर किंवा अर्थाबाबत काही संदिग्धता असल्यास इंग्रजी भाषेतील प्रश्न अंतिम समजल्या जाणार आहे. परीक्षेचे माध्यम केवळ चाचणी पुरते राहणार.

ही परीक्षा २०० गुणांची राहणार. अभियोग्यता परीक्षेत १२० प्रश्नावर १२० गुण तर बुद्धिमत्ता परीक्षेत ८० प्रश्नावर ८० गुण ठेवण्यात आले आहे. अभियोग्यता या प्रकारात गणित क्षमता, वेग आणि अचूकता, भाषिक क्षमता व अन्य घटक यावर प्रश्न राहतील. बुद्धिमत्ता घटकात आकलन, वर्गीकरण, तर्क, अनुमान, कूटप्रश्न, सांकेतिक भाषा व अन्य घटक राहणार. विषय ज्ञानावर परीक्षा होणार नाही. परीक्षा कालावधी दोन तासांचा असणार आहे. नियुक्त करायच्या रिक्त जागांचा तपशील पवित्र प्रणाली नुसार राहणार आहे.

# पाणीटंचाई निवारणाची कामे तातडीने पूर्ण करावीत



## – जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती–** जिल्ह्यात प्रामुख्याने ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या दिवसात पाणीटंचाई जाणवत आहे. गावांचे पारंपारिक पाण्याचे स्त्रोत कोरडे पडल्याने नागरिकांसमोर पाणीटंचाईचे संकट आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी पुर्णत्वास आलेल्या योजना तातडीने सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्ह्यातील उन्हाळयातील पाणीटंचाई निवारणासंदर्भात पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, नगरपालिकांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, पाणीटंचाई आणि पाणी पुरवठ्यातील अनियमितता याबाबत तक्रारी आणि निवेदने वाढत आहे. पाणी टंचाई जाणवणाऱ्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र हा तात्पुरता पर्याय आहे. याबाबत ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी कामे सुरू केली आहे, ती तातडीने एक महिन्याच्या आत पूर्ण करावीत, कामे पूर्ण करून नागरिकांना त्यांच्या घरी पाणी पुरवठा कशा प्रकारे करता येईल, याचे नियोजन करावे. जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे करण्यात येत आहे. याबाबत आवश्यक असणारी कार्यवाही करून कामे पूर्णत्वास न्यावीत.उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांची टँकरवरील निर्भरता कमी करावी.

गावातील पाणी पुरवठा करणारी यंत्रणा सक्षम ठेवावी. गळती, पाईपलाईनची फुटणे यावर तातडीने कारवाई करून त्याच दिवशी पाणीपुरवठा सुरळीत करावा. पाणी पुरवठा करण्यासाठी योग्य दाबाचा विजपुरवठा होईल, याकडे लक्ष द्यावे. जिल्ह्यातील पाच तालुक्यात पाणी पातळी खाली गेलेली आहे. त्यामुळे याठिकाणी जलपुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणात घ्यावी. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिले.

# भीमटेकडी कौडण्यपूर येथील सभामंडपाचे लोकार्पण

## माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या निधीतून निर्माणित : खासदारांसह मान्यवरांची उपस्थिती



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६अमरावती –** माजी महिला व बालकल्याण मंत्री तथा तिवसा मतदारसंघाच्या माजी आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर यांच्या विकासनिधीतून निर्माणित कौडण्यपूर भीमटेकडी येथील सभामंडपाचे लोकार्पण खासदार बळवंतराव वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले.

माजी आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण समितीचे माजी सभापती दिलीपराव काळबांडे स्वागताध्यक्ष होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी माजी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पूजाताई आमले, माजी सभापती शिल्पाताई हांडे, कौडण्यपूर ग्रामपंचायतीचे सरपंच प्रेमदास राठोड, प्रज्ञशील धम्म विहार, भीमटेकडीचे अध्यक्ष राजेंद्र नाखले, कोषाध्यक्ष प्रा. पंकज वाघमारे, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, प्रा. महादेवराव गडलिंग, किशोर नारे, गौतम ढोणे, मधुकर सोमकुंवर, मधुकर सवाळे, रुपराव मनोहरे, सिदधार्थ मुंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. कौडण्यपूर भीमटेकडी येथे अनेक वर्षांपासून बौद्ध धम्मउपासक, उपासिकांची वर्दळ असते. त्यांमुळेभीमटेकडीच्या विकासाची मागणी नागरकांकडून केली जात होती. त्याची दखल घेत यशोमतीताई ठाकूर यांच्या निधीतून याकामाला गती देण्यात आली आणि अखेर हे काम पूर्ण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष यशोमतीताई ठाकूर यांनी यावेळी सभामंडपाच्या लोकार्पणाप्रसंगी आपल्या शुभेच्छा व्यक्त करित विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.यावेळी प्रज्ञाशील धम्म विहार समितीच्यावतीने यशोमतीताई ठाकूर यांचा सत्कार सुद्दा करण्यात आला. या प्रसंगी श्रीराम पखाले, राजकुमार सवाळे, सिदधार्थ फाटके, बंडू ढोणे, गणेश गडलिंग, अमोल काळे, संजय काळे, दीपक वानखेडे आदींचा सुद्दा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सिद्धार्थ मुंद्रे यांनी तर आभार प्रदर्शन मधुकर सवाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र नाखले, प्रा. पंकज वाघमारे, गोकुलभाउ खाकसे, मधुकरराव सोमकुंवर,महेंद्र डोंगरे, दिलीप पखाले, आदींसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम केले.भीमटेकडीच्या सौंदर्यीकरणाचा संकल्पनागरिकांच्या भावना समजून घेत माजी आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर या महिला व बालकल्याणमंत्री असताना त्यांच्या विकासनिधीतून भीमटेकडीच्या सभामंडपासाठी निधी देण्यात आला. त्यातून निर्माणित सभामंडपाचे लोकार्पण खासदारांच्या हस्ते करण्यात आले.भीमटेकडीच्या सौंदर्यीकरणासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू , असे खासदार बळवंतराव वनखडे व माजी आमदार ॲड.यशोमतीताई ठाकूर यांनी यावेळी स्पष्ट केले.

# नक्षलविरोधी कारवाई थांबवा, शांतीवार्ता करा, नक्षलवाद्यांची पुन्हा सरकारकडे विनवणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६गडचिरोली–** महाराष्ट्र सीमेपासून ४० किमी अंतरावर छत्तीसगड तेलंगणा सीमेवरील ‘करेगुट्टा’ टेकडीवर दहा हजार जवानांनी पहाडीवर एक हजार नक्षलवाद्यांना घेरले आहे. २३ एप्रिलपासून सुरु असलेल्या चकमकीत जवळपास सात नक्षल्यांना कंठस्नान घातले. त्यामुळे हादरलेल्या नक्षलवाद्यांनी पुन्हा शांतीप्रस्ताव पुढे केला आहे. उत्तर-पश्चिम सब झोनल ब्युरो रुपेशने बिजापूरमधील नक्षलविरोधी कारवाई थांबवावी व शांतीवार्ता करावी, अशी विनवणी पत्रकाद्वारे केली आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद हद्दपार करु, असा निर्धार केला आहे. यानंतर छत्तीसगड, महाराष्ट्रात नक्षलविरोधी मोहीम गतिमान झालेली आहे. चारशेहून अधिक नक्षलवाद्यांचा जवानांनी विविध मोहिमांमध्ये खात्मा करुन आक्रमक पवित्रा घेतला आहे. दरम्यान, नक्षलवाद्यांच्या बटालियन क्र. १ चा कमांडर व जहाल नेता हिडमा याचा बालेकिल्ला असलेल्या ‘करेगुट्टा’ पहाडीवर २३ एप्रिलपासून जवानांनी अभियान सुरु केले आहे. यामध्ये सुरक्षा यंत्रणेतील विविध पथकांच्या तब्बल सात हजार जवानांनी पहाडीला वेढा टाकून जहाल नेता हिडमासह इतर नक्षली नेत्यांची कोंडी केली आहे. चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले. माओवाद्यांविरुध्द सुरक्षा यंत्रणा अधिक आक्रमक झाल्याने उत्तर- पश्चिम सब झोनल ब्युरो रुपेश याने २५ एप्रिल रोजी



पत्रक जारी करुन शांतीवार्ताचा पुनरुच्चार केला आहे.

आम्ही सरकारसोबत चर्चेसाठी पोषक वातावरण बनवत आहोत, पण सरकारने ‘करेगुट्टा’ पहाडीवर सर्वात मोठे अभियान सुरु केले आहे. जवानांना परत बोलवावे व शांतीवार्ता करावी. सरकारने एक महिनाभर अभियान थांबवावे , त्यानंतर अनुकूल वातावरण झाल्यानंतर शांतीवार्ता केली जाईल. आम्ही सकारात्मक प्रतिक्रियेसाठी प्रतीक्षा करत आहोत, अशी भावनिक साद रुपेशने सरकारला घातली आहे. यापूर्वीही रुपेशने दोनवेळा पत्रक काढून शांतीवार्ता करावी, अशी विनवणी केलेली आहे.

# बांबूच्या वस्तूने मेळघाटात तीन गावांना ओळख

## परिसरातील २०० घरांची उपजिवीका बांबू वस्तूंवरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मेळघाट –** मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात बिहाली हे गाव आहे. या गावासह परिसरात जवळच असलेल्या म्यानपीठ बोरी व बांबू केंद्र लवाडा येथील २५० पैकी २०० घरांची उपजिविका ही बांबूपासून निर्मित वस्तूमुळेच होत असल्याने या तिन्ही गावांची बांबूच्या वस्तूंचे गाव अशी ओळख आहे.

येथील बहुतांश कुटुंब बांबूंपासून वस्तू बनवण्याच्या व्यवसायात आहेत. बांबूपासून सूप, टोपली, मुलांची खेळणी बनवतात. यासह अनेक छोट्या-मोठ्या, वस्तू या गावातील घरात आढळतात. त्यामुळे सातपुडा पर्वत रांगेतील मेळघाटातील या तिन्ही गावांची बांबूच्या वस्तूंची गाव अशी विशेष ओळख निर्माण झाल्याची गावकरी सोहन कासदेकर यांनी सांगितले. परंपरेनुसार बुरड समाज हा बांबूपासून सूप, टोपल्या तयार करतो. मेळघाटात बिहाली, बुरडघाट या दोन गावांत बुरड समाज बांधवांचे वास्तव्य आहे.

अमरावती धारणी मार्गावर बिहाली येथे बुरड समाज बांधवांच्या ४९ घरांमध्ये बांबूच्या वस्तूंची निर्मिती केली जाते. बुरड समाजाची ही कला गावातील आदिवासी बांधवांनी अंगीकारली असून, बिहाली, ग्यानपीठ बोरी, लवाडा येथील आदिवासीही बांबू वस्तू तयार करतात. मेळघाटात येणार्या पर्यटकांना या तिन्ही गावांत घराच्या अंगणात बांबूंना तासताना अनेक महिला, लहान मुलं, वृद्ध दिसतात. प्रत्येक घराच्या अंगणात बांबू रचून ठेवलेले दिसतात. काही घरांच्या अंगणात या बांबूच्या कमच्यांपासून आकर्षक वस्तूंची निर्मिती केली जात असल्याचेही दिसते. घरोघरी बांबूपासून विविध साहित्य निर्मितीचे काम दिवसभर



सुरू असल्याने घरातील सदस्य या कामात व्यस्त दिसतात. मेळघाटात असणारा बांबू ४० रुपये प्रति नग प्रमाणे खरेदी केला जातो. बांबूच्या लहान साहित्यांची परतवाडा येथील आठवडी बाजारात विक्री केली जाते. याच लगतच्या छोट्या-मोठ्या गावात या साहित्यांना मागणी आहे. घरातील एक सदस्य आठवड्याला या साहित्य विक्रीतून १००० ते १२०० रुपये कमावतो. मेळघाटात बांबूंचे वन असले तरी ते मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या हद्दीत असल्यामुळे हे बांबू तोडण्यास मनाई आहे. यामुळे बांबू मिळण्यास अडचणी येतात. काही संस्थांच्या माध्यमातून बांबू साहित्य खरेदी केले जाते. मात्र, त्यांचा दर परवडत नाही. या संस्थांकडे असणारा बांबू खरेदी करणे महागडे असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. बांबूंचे झाडे हे व्याघ्र प्रकल्पामध्ये येत असल्याने ते सहज मिळणे कठीण आहे. जरी ते बांबू मिळाले तरी त्यांची रक्कम ही जास्त असते. त्यामुळे आम्हाला ते परवडत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

**बांबू सहजासहजी उपलब्ध होत नाही**

हॉटेल, बार, घर या मधील इंटेरियर डिझायनिंगसाठी बांबूंना आता मागणी वाढत आहे.त्यामुळे आम्हाला त्यातून चांगले पैसे मिळतात. शासनाने आम्हाला बांबू अल्प दरात उपलब्ध करून द्यावा. बांबूपासून तयार होणार्या वस्तूंना बाजारपेठेत मागणी वाढली आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांनाही हाताला रोजगार मिळत आहे. मात्र, बांबू सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने येथील रहिवासी सोहन कासदेकर, अजिंक्य विजेकर यांनी खंत व्यक्त केली.

# अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड व आठ वाहनतळ उभारण्यास मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मुंबई**

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली. अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी



सादरीकरणाद्वारे माहिती दिली. अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. तसेच या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा. मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. तसेच शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गेने येणार्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे. त्यावेळी होणार्या संभाव्य गर्दीचा विचार करून व नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाचे विस्तारीकरणाच्या प्रस्तावास यावेळी मान्यता देण्यात आली. यामध्ये ८ वाहनतळे, दोन हेलिपॅड यासह टर्मिनलच्या अद्यावतीकरणाचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्यादरम्यान येणार्या विमाने व हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार आहे. लातूर जिल्ह्याचा सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार होत आहे. त्यामुळे लातूर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी या विमानतळाचा विकास करण्यात यावा. हे विमानतळाचा लातूरसह बीड, धाराशिव या जिल्ह्यांनाही लाभ होईल. तसेच कराड येथील विमानतळाचे काम वेगाने सुरू करून तेथे नाईट लँडिंगची सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.चंद्रपूर येथील विमानतळावर चार्टड विमाने उतरू शकतील अशी सुविधा तयार करण्यासाठी तेथील धावपट्टी वाढविण्यात यावी. गडचिरोली येथील विमानतळासाठी दोन ते तीन पर्यायी जागांचा विचार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी रत्नागिरी, अकोला, कोल्हापूर, नांदेड, धुळे येथील विमानतळाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. प्रादेशिक जोडणी योजना (रिजनल कनेक्टिव्हीटी स्किम) अंतर्गत सध्या राज्यात १६ मार्गांवर विमानसेवा सुरू असून उड्डाण योजनेअंतर्गत राज्यातील आठ प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, संचालक मंडळतील सदस्य तथा वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

# श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचा समारोप

## सुसंस्कार शिबिरे काळाची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील जुना धामणगाव येथे श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार घेण्यात आले होते.या शिबिराचा समारोप गुरुवारला (ता.२५) झाला.

श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर समारोपीय कार्यक्रमामध्ये अध्यक्ष म्हणून क्रीडा विभागाचे प्रमुख महेश धांदे वस्तीगृहाचे प्रमुख अंकुश डुकरे ,काजल आरोग्य ,सेविका संघर्षा पाटील ,पद्माताई पटोरकर, हर्षाली कुईटे माधुरी व शिबिर प्रमुख प्रमुख मार्गदर्शक ग्रामगीताचार्य हनुमंत ठाकरे उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ,संत गाडगे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले . गुरुदेव हमारा प्यारा है जीवन का विजयारा या संकल्पगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली हिमांशू घाडगे या विद्यार्थ्यांनी दीपा सणाद्वारे सर्व पाहुण्यांचे प्रात्यक्षिक आणि स्वागत केले. बौद्धिक तासिका अंतर्गत विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती ,राष्ट्रप्रेम राष्ट्रीय एकात्मता ,नव समाज,




संत महापुरुष यांच्या विषयी माहिती दिल्या गेली होती त्यावर विद्यार्थ्यांनी वकृत्व कला सादर केली त्यामध्ये मेहुल शेंडे ,नक्षमेंढे, अंश माणूसमारे, प्रणय उल्हे या विद्यार्थ्यांनी सुंदर भाषणे सादर केले. पाठांतरामध्ये मराठी श्लोक हिंदी श्लोक, ग्रामगीतेच्या निवडक ओव्या विद्यार्थ्यांनी सादर केले. सोबतच प्यारा हिंदुस्तान है गोपालो की शान है ,भारतात बंधुभाव नित्य वसु दे दे वरची असा दे ही भजने सादर केली .विद्यार्थ्यांनी स्वतःच्या संरक्षणाच्या धडे म्हणून कराटे प्रात्यक्षिक या ठिकाणी सादर केले. प्रमुख मार्गदर्शक प्रमुख हनुमंत ठाकरे यांनी आपल्या भाषणामध्ये म्हणाले आजचे मोबाईलची युग असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होत आहे ,जे पाहू नये ते पाहायले जात आहे जे खाऊ नये ते खाल्ले जात आहे तू जे पिऊ नये ते पिल्या जात आहे. यांने आज प्रत्येक आई-वडील त्रस्त झालेले आहे यावर एकच उपाय संजीवनी म्हणजे बालवयात सर्वांगीण सुसंस्कार शिबिर हे आपल्या मुलांमध्ये परिवर्तन करू शकते म्हणून श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर काळाची गरज आहे ,असे प्रतिपादन हनुमंत ठाकरे यांनी केले. विद्यार्थ्यांना चांगल्या कार्यासाठी बक्षीस वितरण करण्यात आले .राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संत साहित्याचे वाटप यावेळी करण्यात आले .शेवटी सामुदायिक प्रार्थना करण्यात आली व सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र असे वाटप करून राष्ट्र वंदना करून कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेंडे आभार प्रदर्शन पार्थ वासेकर यांनी केले कार्यक्रमाला संपूर्ण शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# हॅलो, आम्ही तेलंगणा पोलिस... चिखलदऱ्यात प्रोफेसर झाले 'डिजिटल अरेस्ट', उकळले १४.३० लाख रुपये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चिखलदरा**

'हॅलो, आम्ही तेलंगणा पोलिस आणि सीआयडी मुंबई आहोत. आपण बंगळुरूमध्ये एक सिम कार्ड विकत घेतले. त्याचा गैरवापर झाला आहे. बऱ्याच महिलांनी तक्रारी केल्या आहेत. म्हणूनच मानवतस्करीचे प्रकरण आपल्याविरुद्ध नोंदवले गेले आहे,' असे धमकावत एका प्राध्यापकाला डिजिटल अरेस्ट करीत त्यांच्याकडून १४.३० लाख रुपये उकळण्यात आले.

प्राध्यापकांना २५ लाख रुपये द्यायचे होते. त्यासाठी वारंवार कॉल करण्यात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यावेळी डिजिटल अरेस्टचे जाळे फेकण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. शांताराम चव्हाण (५६, रा. अनंत नगर, नवसारी) असे चिखलदरा येथे कार्यरत व फसवणूक झालेल्या प्राध्यापकाचे नाव आहे. त्यांना २१ एप्रिल रोजी सकाळी ११:२७ वाजता वेगवेगळ्या मोबाइल क्रमांकावरून व्हॉटस्ॲपवर व्हिडीओ कॉल प्राप्त



तक्रारदार प्राध्यापकाच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर ऑनलाइन फसवणुकीचे प्रकरण नोंदवले गेले. या प्रकरणाची चौकशी केली जात आहे. अमरावती शहरातील डिजिटल अरेस्टचे हे तिसरे प्रकरण आहे.

**– आसाराम चोरमले, पोलिस निरीक्षक तथा प्रभारी, सायबर पोलिस स्टेशन.**

झाले. महिलांच्या तक्रारींवरून मानवतस्करीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे तुम्हाला सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडावी लागेल. शिक्षेपासून वाचायचे असेल, तर २५ लाख रुपये ऑनलाइन पाठवा, अशी धमकी त्या व्यक्तीने शांताराम चव्हाण यांना दिली. गुन्हा दाखल होण्याच्या भीतीने घाबरलेले प्रा. चव्हाण हे त्या व्यक्तीच्या पूर्णपणे कह्यात गेले. त्यांनी तब्बल १४ लाख ३० हजार रुपये एचडीएफसी बँकेच्या अनोळखी खात्यावर जमा केले.

# उपविभागीय अधिकाऱ्यांच्या ई-संवाद मध्ये नांदगाव पेठ वासीयांनी मांडल्या तक्रारी

## राख, रस्ते,स्थानिकांच्या रोजगारांवर वेधले लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नांदगाव पेठ**

उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्या ई-संवाद मध्ये अमरावती तालुक्यातील अनेक नागरिकांनी आपल्या तक्रारींचा पाढा वाचला. रस्त्यावरून उडणारी राख, अवैधरित्या साठवलेली राख,शेतीरस्ते, खुल्या जागा,ले आउट मालक घेत नसलेली ग्रामपंचायतची ना हरकत तसेच एमआयडीसीमध्ये स्थानिक युवकांना मिळत नसलेला रोजगार अश्या अनेक मुद्यांवर नागरिकांनी उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्याशी संवाद साधून त्यातून सकारात्मक मार्ग काढण्याची विनंती केली. विभागाला प्राप्त होत असलेल्या तक्रारींबाबत मंगळवारी सकाळी १० ते११ वाजताच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी यांनी तालुक्यातील नागरिकांशी गुगल मिट द्वारे संवाद साधला. तालुक्यातील शेकडो नागरिकांनी यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्यासमोर आपल्या तक्रारी मांडल्या.राष्ट्रीय महामार्गावरून राखेची वाहतूक करतांना वाहनांमधून उडणारी राख नागरिकांच्या व चालकांच्या डोळ्यात शिरून अपघाताचे वाढते प्रमाण तसेच होणारे प्रदुषण आणि रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्यावर अवैधरित्या केलेल्या राखेच्या साठवणूक बाबत तसेच नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत पत्रकार मंगेश तायडे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार करून यावर कारवाईची मागणी केली. भाजपचे प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी नारायणपूर अमन्नापूर मधील सर्व ले आऊट मधील रस्ते व खुल्या जागेचा विकास, खानापूर रस्ता,नांदुर रस्ता, सालोरा रस्ता, शेवती रस्ता,लखमापूर मारोती रस्ता, भिवापूर रस्ता ,जामठी या शेतशिवार रस्त्याची शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या हिशोबाने तातडीने दुरुस्ती करून देण्याची मागणी करण्यात आली. नांदगाव पेठ एमआयडीसी मध्ये स्थानिकांना रोजगार न देता परप्रांतीय तसेच शंभर किलोमीटर दुरवरील गावातील युवकांना रोजगार देण्यात येतो. आमच्या गावात कारखाने असून स्थानिकांना केवळ रोषापायी रोजगार न देणे उचित नसून या गंभीर बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी अभिजित बानासुरे या प्रहार कार्यकर्त्याने केली आहे. याशिवाय अनेक गावातील नागरिकांनी ले आऊट मालकांबद्दल तक्रारी केल्या. ले आऊट मालक ग्रामपंचायतची कोणतीही परवानगी न घेता ले आउट विकसित करतात मात्र त्यानंतर त्या ठिकाणी राहायला येणाऱ्या नागरिकांना इतर कामासाठी ग्रामपंचायतची गरज पडते तेव्हा आमच्या कडे संबंधित ले आउट बद्दल कोणतीही माहिती नसल्याने समस्या उद्भवतात.या सर्व तक्रारींवर आपण कार्यवाही करू असे आश्वासन या ई संवाद मध्ये उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी दिले. तर या चांगल्या उपक्रमाबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार देखील व्यक्त केले.

# सोमवारी सेवा हक्क दिन कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

जिल्हा प्रशासनातर्फे सोमवार, दि. २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत आहे. दशकपूर्तीनिमित्त जिल्हा आणि ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. सोमवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सेवा हक्क दिन आयोजित करण्यात आला आहे, यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# बडनेरात लाचखोर मुख्याध्यापिका, सहायक शिक्षिका ताब्यात

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६बडनेरा**

किरकोळ रकमेची लाच घेणाऱ्या मुख्याध्यापिका व सहायक शिक्षिकेला शुक्रवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहाथ पकडले. बडनेरातील होलीक्रॉस हिंदी प्रायमरी शाळेचे हे कर्मचारी आहेत.

पोलिस सूत्रांनुसार, संगीता फ्रान्सिस धनवटे (४२, रा. टीचर्स क्वार्टर) ही मुख्याध्यापिका व अश्विनी विजय देवतारे (३७, रा. भूमिपुत्र कॉलनी, काँग्रेसनगर रोड, अमरावती) असे लाच घेणाऱ्या सहायक शिक्षिका आरोपींची नावे आहेत. या प्रकरणातील तक्रारदाराचा मुलगा होली क्रॉस हिंदी प्रायमरी शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिकतो. शाळेला शासनाकडून शंभर टक्के अनुदान मिळत असतानाही वार्षिक शैक्षणिक शुल्क १५५० रुपये आकारले जाते. त्यापैकी ८०० रुपये यापूर्वी तक्रारदाराने दिले. उर्वरित ७५०



रुपये देण्यासाठी वर्गशिक्षिका असलेली सहायक शिक्षिका व मुख्याध्यापिका वारंवार मागणी करीत असल्याची लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अमरावती येथील कार्यालयाला देण्यात आली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. वृत्त लिहिस्तोवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलिस अधीक्षक सचिंद्र शिंदे, उपअधीक्षक अभय अष्टेकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक भारत जाधव, केतन मांजरे, अंमलदार उपेंद्र थोरात, वैभव जायले, शैलेश कडू, चित्रा वानखेडे व राजेश बहिरट यांचा या कारवाईमध्ये सहभाग होता.

# अखेर कापुसतळणी येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील घोटाळ्याचे सत्य उघड

## तब्बल चार पात्र लाभार्थ्यांना डावलून जवळच्या लाभार्थ्यांना घरकुल चा दिला लाभ : सामाजिक कार्यकर्ते अरुण शेवाणे यांच्या अन्नत्याग उपोषणाला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अंजनगांव सुर्जी**

अंजनगाव पंचायत समिती अधिनिष्ठ घरकुल विभाग कार्यरत असून या विभागात तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामीण भागातील गरीब, गरजू लोकांना घरकुल योजना राबविण्यात येते. गावातील सरपंच सचिव यांच्या ठरावानेशी लाभार्थ्यांच्या घरकुल योजना राबविण्यात येते. परंतु कापुसतळणी ग्रामपंचायत मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुल वाटपात घोटाळा होत असल्याची चर्चा गावभरात जोरात होत होती. या व्हायरल चर्चेची दखल व गावकऱ्यांच्या विनंतीला मान देऊन गटविकास अधिकारी यांना गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रहार संघटना उप तालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतील भ्रष्टाचाराच्या चौकशी साठी एक महिन्यापूर्वी निवेदन दिले होते. परंतु त्या निवेदनाची दखल घेतल्या जात नसल्यामुळे अखेर कापुसतळणी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर दि. २४/४/२०२५ रोजी अन्नत्याग उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन दिले होते. त्या निवेदनावर गटविकास अधिकारी यांनी लगेच चौकशी समिती नेमली होती. परंतु चौकशी समितीने चौकशी केली



नसल्यामुळे अखेर २४ तारखेला ग्रामपंचायत कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषणाला सुरुवात करण्यात आली होती. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी रात्री १० वाजता विस्तार अधिकारी श्री राऊत यांनी उपोषण कर्ते अरुण शेवाणे यांना अहवाल देऊन उपोषण मागे घेण्यास विनंती केली . त्या अहवालातून तब्बल चार पात्र व गरजू लाभार्थ्यांना डावलण्यात आले असल्याचे उघड झाले असून आज रोजी घरकुल योजने पासून सदर चार लाभार्थी वंचित राहिले आहेत. त्यामुळे उपोषणकर्ते यांनी केलेला घोटाळ्याचा आरोप खरा ठरला. पात्र व गरजू लाभार्थ्यांना डावलण्यात आलेल्यांमध्ये अनुक्रमे विलास यादवराव काळपांडे, रवींद्र नामदेवराव नवले, पंजाब गणपत कावरे पात्र आहेत आणि ईश्वरदास किसन सातवटे यांना घरकुल चा लाभ मिळाला असल्याचा ठपका आहे. त्यामुळे या पात्र लाभार्थ्यांना आज रोजी घरकुल योजनेपासून वंचित राहावं लागत आहे. या पात्र लाभार्थ्यांना घरकुल मिळण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्याचे उपोषणकर्ते अरुण शेवाणे यांनी आमच्या प्रतिनिधींची बोलताना सांगितले. या उपोषणाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप सातवटे, अमोल सगणे, देवेंद्र मळसने, कमलकिशोर शेंडे, संजय हिंगे, अ. निसार शेख इस्लाईल, प्रशांत सरदार चेतन बामणेकर आदींनी परिश्रम घेतले.

# प्रतिकात्मक पुतळा जाळला, चक्का जाम जोरदार नारेबाजी, संतापाची लाट

## पहलगाम घटनेच्या निषेधार्थ चांदूर बाजार मध्ये विहिंप, बजरंग दलाचे निदर्शने





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चांदूर बाजार**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करत विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने २६ एप्रिल रोजी चांदुर बाजार शहरातील जयस्तंभ चौकात धरणे आंदोलन करण्यात आले व मृत्युमुखी पावलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली दिली यावेळी कार्यकर्त्यांनी दहशतवाद्याचा प्रतीकात्मक पुतळा व पाकिस्तानाचे झेंडे जाळून निषेध नोंदविला यासह चक्काजाम सुद्धा कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आला यावेळी परिसरात पाकिस्थानाच्या विरोधात संतापाची लाट होती.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली असून ठिकठिकाणी निषेध आंदोलन केले जात आहेत दरम्यान, सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व सर्व हिंदुत्ववादी संघटना यांच्या वतीने चांदूर बाजार शहरातील मुख्य चौकात आंदोलन करत निदर्शने करण्यात आली यावेळी पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत संतप्त आंदोलकांनी दहशतवाद्याच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून त्याचे दहन केले यामध्ये जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेला पूर दहशतवादी हल्ला अत्यंत निषेध आणि दुःखद आहे हा हल्ला देशाच्या एकता आणि अखंड तेवर हल्ला करण्याचा प्रयत्न आहे सरकारने सर्व पिढि त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी आणि या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना कठोर शिक्षा करण्यासाठी सरकारने योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी संतप्त आंदोलकांकडून करण्यात आली यावेळी गोपाल तिरमारे, अक्षय तायडे व मुरली माकोळे यांनी तीव्र व संतप्तजनक भावना व्यक्त केल्या येणाऱ्या काळात पाकिस्तानच्या लाहोर मध्ये तिरंगा गाडू असा इशारा देखील आंदोलकांकडून देण्यात आला यावेळी आनंद उर्फ टिकू अहिर, मनोज कटारिया, अतुल रघुवंशी, लखन चौधरी, गोलू पोकळे, शुभम सपाटे, सागर वानखडे, प्रवीण कडू, विक्की ठेंबरे, शुभम तरारे, भूषण अहिर, गजाजन राऊत, राजू तंतरपाळे, शुभम पांडे, युवराज जामूनपाने, विजय मोहोळ, आकाश उठाळे, राम यावले, जीवन पवार, गजानन सोळंके सह आदी आंदोलनकर्ते उपस्थित होते.

# विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे यांचा भव्य सत्कार.....



विधानपरिषद सभापतीपदी .राम शिंदे यांची निवड झाल्याबद्दल समस्त धनगर समाजातर्फे ना. प्रा. राम शिंदे यांच्या भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. पंजाबराव ऊपाख्य भाऊसाहेब देशमुख चौक (पंचवटी) येथील डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे हा कार्यक्रम उत्सहात पार पडला. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष ॲड. दिलीप एडतकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देत जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित होते.

# सावरकरांविरोधात बोलल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींच्या जिभेला चटका दिला - खा. डॉ. अनिल बोंडे यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

स्वातंत्र्यवीर सावरकरांविरोधात अपमानास्पद वक्तव्य केल्याने सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांचे कान टोचल्याची प्रतिक्रिया राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी व्यक्त केली आहे. डॉ. बोंडे म्हणाले, जेव्हा राहुल गांधी सावरकरांविषयी वाह्यात वक्तव्य करत होते, तेव्हा मीच म्हटले होते की त्यांच्या आई सोनिया गांधी यांनी त्यांच्या जिभेला चटका द्यावा. पण त्यांनी ते काम केले नाही. मात्र, आनंदाची गोष्ट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने हे काम केले आहे.ते पुढे म्हणाले,



स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १४ वर्षे काळकोठडीत हालअपेष्टा सहन केल्या. स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले. अशा महापुरुषांविरोधात उघडपणे अपमानास्पद बोलणे राहुल गांधींच्या स्तरात बसत नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मी असे म्हणेन की सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या जिभेला चटका दिला आहे. डॉ. बोंडे यांनी काँग्रेसवरही निशाणा साधत म्हटले, राहुल गांधींवर टीका झाल्यावर काँग्रेसचे नेतेही सावरकरांविरोधात बोलायला लागतात. सर्वोच्च न्यायालयाची ही चपराक त्यांनी समजून घ्यावी.

# शिवसेना उबाठा गटाचे अनोखे आंदोलन

## मुत्रीघराच्या दाराजवळ पाय पुसायला ठेवला पाकिस्तानचा ध्वज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

पहलगाम जम्मू कश्मीर मधील हल्लूयाच्या निषेधार्थ शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने अमरावती शहर प्रमुखप्रवीण हरमकर यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले शहरातील जयस्तंभ चौक येथील मुत्रीघरावर येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांसाठी पाकिस्तानचा ध्वज पायपुसण्यासाठी ठेवत झालेल्या भायंद हल्याचा त्रिव निषेध केला लघुशंकेसाठीं प्रत्येक नागरिक हा पाकिस्थानचा ध्वज तुडवून ये जा करत होता.



अशा अनोख्या पद्धतीने पाकिस्तानचा निषेध करण्यात आला व यावेळी मृत पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी उपशहर प्रमुख पंजाबराव तायवाडे उपशहर प्रमुख विजय जी ठाकरे संजय थुले विभाग प्रमुख गोविंदजी दायमा राजू हिरे संदीप मानेकर आनंद राठी उमेश केडिया रुपेश आलेकर लाला अंजुम मनीषा रामावत प्रवीण केशरवाणी शाखाप्रमुख जुगल दवे युवा सेना शाखाप्रमुख जवरगेट निकेश शर्मा विभाग प्रमुख विनोद शर्मा विनोद माडवे व ईतर शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# भाजपा अमरावती शहरच्या वतीने प्रा. राम शिंदे यांचे जंगी स्वागत

## संघटनात्मक बैठकीत पक्षवाढीसाठी मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

आज अमरावती शहर भाजपाच्या वतीने भाजपा अमरावती शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनात्मक बैठक भाजपा जनसंपर्क कार्यालयात पार पडली यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ना. प्रा. श्री. राम शिंदे यांचे भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.



या बैठकीत अमरावती शहरातील संघटनात्मक रचना, पक्षाची आगामी दिशा, तसेच कार्यपद्धतीवर विस्तृत चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधताना ना. राम शिंदे यांनी सर्वांनी एकजुटीने काम करत भाजपा पक्ष अधिक बळकट करण्याचे आवाहन केले. तसेच, महाराष्ट्र सरकारच्या विविध योजना व उपक्रम सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात नव्याने नियुक्त झालेल्या भाजपा अमरावती शहर मंडल अध्यक्षांचा ना. राम शिंदे यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला.

पक्षाची वाढ कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच शक्य आहे. महाराष्ट्र सरकारच्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहचवणे ही आपली जबाबदारी आहे संघटनेच्या बळकटीकरणाचा निर्धार व्यक्त करत पक्ष संघटनेच्या बळकटीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल असल्याचे मत भाजपा अमरावती शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केले.यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष श्री. प्रविण पोटे पाटील, खा. अनिल बोंडे, जयंत डेहनकर, दिनेश सूर्यवंशी, शेखर भोयर, रविराज देशमुख, सतीश करेसिया, विवेक कलोती, अनिताताई राज, संगीत शिंदे , शिवसेना शिंदे गट जिल्हा अध्यक्ष अरुण पडोळे यांसह अनेक मान्यवर व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाळीव प्राण्यासांठी आता स्वतंत्र स्मशानभूमी सरकारचे महापालिकांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

राज्यातील सर्वच शहरांमध्ये कुत्रे, मांजर यांसारख्या पाळीव प्राण्यांची संख्या मोठी आहे. अनेक घरांमध्ये या प्राण्यांचे स्थान घरातील सदस्याइतकेच महत्त्वाचे असते. आजार, अपघात किंवा वयोमानामुळे या प्राण्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नसल्याने अनेकांची अडचण होत होती, ती दूर करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्यात कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची सूचना नगर विकास विभागाने केली आहे. यासंदर्भात परिपत्रक काढण्यात आले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानमंडळात २५ जुलै, २०२३ रोजी 'राज्यातील पाळीव प्राणी कुत्रे, मांजरे, पांढरे उंदीर इत्यादी प्राण्यांसाठी स्मशानभूमीची व्यवस्था करावी' या विषयासंदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. राज्यातील काही स्थानिक नागरी स्वराज्य संस्था मनुष्य स्मशानभूमीच्या शेजारी राखीव जागेत तर काही स्थानिक नागरी स्वराज्य संस्था घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी राखीव जागेत पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीची व्यवस्था करतात. स्मशानभूमीच्या शेजारी जागेत पाळीव प्राण्यांचा अंत्यविधी केल्यास धार्मिक, सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. पाळीव प्राण्यांचा अंत्यविधी करताना योग्य दक्षता न घेतल्यास दुर्गंधी व आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्या राखीव जागेत इतर प्राण्यांचे मृतदेह फेकण्याची शक्यता असते.राज्यात कुत्रे, मांजर, पांढरे उंदिर, गौवंशीय प्राणी इत्यादी पाळीव प्राणी पाळले जातात. पाळीव प्राण्यांची वयोमर्यादा कमी



असते व त्यांच्या मृत्यूनंतर मृत्यू प्राणी खाडी, तलाव, मोकळया जागा, पाण्याचे डबके किंवा रस्त्यावर फेकले जातात. मृत्यू प्राण्यांच्या शरीराची योग्य विल्हेवाट न केल्यास दुर्गंधी पसरुन रोगराई पसरण्याचा धोका असतो. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभुमीवर राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून दयावी, अशी सूचना करण्यात आली आहे.

या जागेस संरक्षक भिंत व सुरक्षा व्यवस्था असावी. मृत प्राण्यांचा अंत्यविधी करताना योग्य ती दक्षता घेण्यात यावी, जेणे करुन त्यातून दुर्गंधी निर्माण होणार नाही. पाळीव प्राण्यांचे मृतदेह इतर ठिकाणी टाकले जाणार नाहीत, त्यामुळे इतर आजार पसरणार नाहीत, याची दक्षता संबंधित नागरी स्वराज्य संस्था यांनी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# अमरावती ते तिरुपती एक्सप्रेस १५ मे रोजी रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

धर्मावरम स्थानकावर यार्ड परिवर्तनाचे कामासाठी लाइन ब्लॉक घेतला आहे. यामुळे काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. यात अमरावती- तिरुपती-अमरावती एक्स्प्रेस काही दिवस रद्द करण्यात आली आहे. गाडी संख्या अमरावती - तिरुपती एक्स्प्रेस १५ मे रद्द करण्यात आली आहे. तिरुपती-अमरावती एक्स्प्रेस १७ मे रोजी रद्द करण्यात आली आहे. अकोला ते तिरुपती विशेष गाडी ४ आणि ११ मे रोजी गुत्ती, रेनुगुंठा, तिरुपती मार्गे वळवण्यात आली आहे. तिरुपती ते अकोला विशेष गाडी ९ आणि १६ मे, तिरुपती, रेनुगुंठा आणि गुत्ती मार्गे वळवण्यात आली आहे.



# राज्यावर पुन्हा अवकाळी संकट! मराठवाडा अन् विदर्भात धो...धो कोसळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

राज्यात कडाक्याचा उन्हाळा जाणवत आहे. काही शहरात तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचलं आहे. दुपारच्या वेळी तापमानात मोठी वाढ होत आहे. अशी परिस्थिती असताना अवकाळी पावसाचं संकटाचाही इशारा मिळाला आहे. पुढील तीन दिवस ठिकठिकाणी अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबई, पुणे, मराठवाडा, विदर्भासह अन्य ठिकाणी पाऊस होईल अशी शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली आहे.



आज पहाटे राज्यात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. रायगड, पनवेल, यवतमाळ या ठिकाणी पाऊस झाला. आज राज्यात अनेक जिल्ह्यांत सकाळपासूनच ढगाळ हवामान आहे. त्यामुळे दिवसभरात पावसाची शक्यता दिसत आहे. हवामानात अचानक झालेल्या या बदलाने उष्णता काहीशी कमी झाली आहे. मात्र जर पाऊस झाला तर शेतातील पिकांना नुकसानकारक ठरणार आहे.पुण्यासह राज्यात आज वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. सोलापूर आणि मराठवाड्यातील काही भागांत पावसाचा अंदाज आहे. सोलापूर, लातूर, धाराशिव,नांदेड जिल्ह्यात आज तुरळक ठिकाणी गारपिटीची शक्यता असल्याने यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. सोलापूर, लातूर, धाराशिव, नांदेड जिल्ह्यात मेघगर्जनेसह गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे.मराठवाड्यातील जालना जिल्ह्यांत पुढील दोन दिवस यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# हवाई दलाचे महाराष्ट्रातील पहिले संग्रहालय नागपुरात संग्रहालय मंगळवार वगळता आठवडाभर खुले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नागपूर**

नव्या पिढीला भारतीय हवाई दलाचा इतिहास, परंपरा आणि हवाई दलाच्या प्रारंभी पासून आजवर वापरात असलेले विमाने, हेलिकॉप्टर, रडार आणि इतर उपकरणांची माहिती देणारे हवाई दलाचे महाराष्ट्रातील पहिले संग्रहालय नागपुरात सुरू झाले आहे. हे संग्रहालय मंगळवार वगळता आठवडाभर खुले करणार आहे.



नागपुरातील वायुसेनानगर येथे 'एअर फोर्स म्युझियम'चे उदघाटन शुक्रवारी मेंटेनन्स कमांडचे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ एअर मार्शल विजय कुमार गर्ग यांच्या हस्ते करण्यात आले. एअरफोर्स म्युझियममध्ये भारतीय लष्करी हवाई वाहतुकीच्या आठवणींचा समृद्ध संग्रह आहे आणि भारतीय हवाई दलाचा इतिहास प्रदर्शित केला आहे. संग्रहालयाच्या प्रवेशद्वारावर एमआय ८ हेलिकॉप्टर, मिग-२१ लढाऊ विमाने आणि पिचोरा क्षेपणास्त्र आहे.

संग्रहालयाच्या विविध विभागांमध्ये आयएएफचा इतिहास, दृकश्राव्य विभाग, उपकरण प्रदर्शन विभाग, शस्त्र विभाग इत्यादींचा समावेश आहे.

संग्रहालयात 'फ्लाईंग सिम्युलेटर' विभाग देखील आहे. तेथे अभ्यागतांना लढाऊ उड्डाणाचा 'रिअल टाइम'अनुभव घेता येणार आहे.मंगळवार व शासकीय सुटीचा दिवस वगळता सर्व दिवशी सकाळी १० ते दुपारी २ आणि दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेनुसार संग्रहालय सर्वसामान्यांसाठी खुले राहणार आहे.